महाराष्ट्र शासन

डॉ. रेणु पटेल यांनी नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात आदिवासी स्त्रीया व मुली यांचे सर्व्हेक्षण करून तयार केलेला अहवाल

आणि

दैनिक "लोकसत्ता" या वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिलेली बातमी ....

" <u>सुरगाण्यात होतो, आदिवासी महिलांचा लिलाव</u>". ....

या प्रश्नाबाबत

सर्व्हेक्षण पाहणी अहवाल

:

:

:

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,

२८, राणीचा बाग, पुणे- ४११००१.

१९८८ - ८९

महाराष्ट्र शासन

डॉ. रेणू पटेल यांनी नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात आदिवासी स्त्रीया व मुली यांचे सर्वेक्षण करून तयार केलेला अहवाल

आणि

दैनिक "लोकसत्ता" या वृत्तपत्रात प्रसिध्दीस दिलेली बातमी ....

" <u>सुरगाण्यात होतो, आदिवासी महिलांचा लिलाव</u>", ....

या प्रश्नाबाबत

सर्वेक्षण पाहणी अहवाल

:

:

:

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,
२८, राणीचा बाग, पुणे- ४११००१.

<u>१९८८ - ८९</u>

# - प्रस्तावना -

डॉ. रेणू बी.पटेल, एकात्मिक बालविकास योजना सल्लागार व बालरोग तज्ञ, जे.जे.हॉस्पिटल, मुंबई-८ यांनी दिनांक ६ ते ८ जून, १९८८ या तीन दिवसाच्या सुरगाणा तालुक्याचा दौरा केला. या तीन दिवसाच्या दौ-यात सुरगाणा तालुक्यातील "हतगडी, प्रतापगड, सुर्यगड, तब्याडा आणि घोडांबे" या ५ गावांना भेटी देऊन "आदिवासी स्त्रिया व मुली यांची आरोग्यविषयक पाहणी" करून अहवाल तयार केला. हा अहवाल त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडे दिनांक ११ जुलै, १९८८ रोजी सादर केला व त्याची एक प्रत केंद्र शासनाच्या कल्याण मंत्रालयाकडेही [आदिवासी विकास विभागात] सादर केली.

डॉ. रेणू बी. पटेल यांच्या मूळ अहवालावरून दिनांक २१ जुलै १९८८ रोजी दैनिक "लोकसत्ता" मुंबई या वृत्तपत्रात श्री. नारायण तिवारी यांनी ...

" सुरगाण्यात होतो, आदिवासी महिलांचा लिलाव."

या ठळक शिर्षकाखाली प्रसिध्दी देऊन खळबळ उडवून दिली. या बातमीने सुरगाणा तालुक्यातील आदिवासींमध्ये कांहीसा असंतोष वाढला. या बातमीतील अनेक विधाने आदिवासींची मुख्यत: स्त्रियांची बदनामी करणारी असल्याने या भागातील आदिवासी कार्यकर्ते, स्वयंस्फूर्त संस्थांचे कार्यकर्ते इत्यादिंचे डॉ. पटेल यांच्या विचाराचे खंडण करणारे विविध लेख नाशिक भागातील दैनिकातून प्रसिध्द झाले. त्यामुळे सदर प्रकरणाबाबत लोकसभेत देखिल प्रश्न उपस्थित करण्यात आला.

अनेक राजकीय व अशासकीय सदस्यांनी महाराष्ट्राचे मा. आदिवासी विकास मंत्री यांचेकडे या प्रकरणी चौकशी करण्याचा आग्रह धरला. शासनाच्या आदिवासी विकास विभागाने याबाबत चौकशी करण्यासाठी व अभिप्राय पाठविण्यासाठी मा. अतिरिक्त आयुक्त [आदिवासी विकास] नाशिक आणि प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, जि. नाशिक आणि संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१ यांना दि. २२ जुलै, १९८८ रोजी अर्ध शासकीय पत्रान्वये आदेश दिले.

शासनाच्या उल्लेखित आदेशान्वये या संस्थेतील श्री. एम.बी. शेल्के, संशोधन सहाय्यक आणि श्री. डी.एस.मावची, संशोधन सहाय्यक यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली डॉ. रेणु पटेल यांनी भेटी दिलेल्या ५ गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन, आदिवासींशी प्रत्यक्ष चर्चा करून वास्तव्य परिस्थितीचे सर्वेक्षण केले. त्यांनी प्रत्यक्ष फिरून मिळविलेल्या माहितीच्या आधारे काही निष्कर्ष काढण्यात आले. ते या अहवालात समाविष्ट करण्यात आले आहेत आणि सर्वेक्षण करतांना त्या भागात ज्या त्रुटी आढळलेल्या आहेत, त्या शिफारशींच्यारूपाने या अहवालात अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

सदर अहवालातील निष्कर्ष आणि शिफारशी वास्तव परिस्थितीवर आधारलेल्या असल्याने प्रशासनास या प्रश्नाची उकल होण्यासाठी व पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी त्यांचा उपयोग होईल असा मला विश्वास वाटतो.

[डॉ. गोविंद गारे]
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | | पान नं. |
|---|---|---|
| १. | सुरगाणा तालुका | १ ते २ |
| २. | डॉ. रेणू बी. पटेल, एकात्मिक बालविकास योजना सल्लागार व बालरोग तज्ञ, जे.जे. हॉस्पिटल मुंबई-८ यांच्या सर्वेक्षण अहवाला वरून दैनिक ... "लोकसत्ता" मुंबई या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी. | ३ ते ६ |
| ३. | सर्वेक्षण अहवाल | ७ ते १९ |
| ४. | सर्वेक्षण पाहणीतील निष्कर्ष | २० ते ३२ |
| ५. | कोकणा जमातीच्या लग्नाचे विशिष्ट कार्यक्रम. | ३३ ते ३८ |
| ६. | डॉ. रेणू पटेल यांचा सर्वेक्षण अहवालाचे संदर्भात अभिप्राय | ३९ ते ४९ |
| ७. | शिफारशी | ५० ते ५६ |


....

# प्रकरण - १ ले

## सुरगाणा तालुका

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुका हा सुमारे ९१ टक्के आदिवासी लोकसंख्येचा आहे. नाशिक पासून ७५ कि.मी. अंतरावर नाशिक ते सुरत या राष्ट्रीय महामार्गावर "बोरगांव" हे डोंगराळ भागातील गांव आहे. या गावांपासून पश्चिमेला सुमारे २० कि.मी. अंतरावर सुरगाणा हे गांव आहे. सुरगाण्याच्या उत्तरेला ४ कि.मी. आणि पश्चिमेला २५ कि.मी. अंतरावर गुजरात राज्याची हद्द सुरु होते. सुरगाणा तालुका चोहोबाजूंनी डोंगर, टेकड्यांनी, हिरव्यागार वनराईनी व्यापलेला आहे. जमीन शेकडा ७५ टक्के डोंगराळ, खडकाळ आहे. तथापि या भागातील आदिवासी लोक डोंगर उतारावर, नद्या नाल्यांच्या काठी, हंगामी पाणथळ्याच्या ठिकाणी थोडीफार नागली, वरई, भात, खुरासणी, भुईमूग इ. पिके काढतात. या तालुक्यातील हवामान भात, नागली, वरई या पिकांना फार अनुकूल आहे. त्यामुळे ह्या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात आहे.

सुरगाणा हे तालुक्याचे ठिकाण आहे. परंतु तेथे एस.टी. बस डेपो नाही. तथापि व्हाया सुरगाणा गुजरात राज्याच्या व महाराष्ट्र राज्याच्या एस.टी. बसेस येऊन ये-जा करतात. या तालुक्याच्या ठिकाणी तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, गट विकास अधिकारी यांचे कार्यालय, विद्युत मंडळाचे कार्यालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, गुरांचा दवाखाना, शासकीय आदिवासी मुलांचे वसतिगृह, शासकीय आदिवासी मुलींचे वसतिगृह, पोस्ट आणि टेलिग्रॅम कार्यालय, बांधकाम खात्याचे शासकीय विश्रामगृह, प्राथमिक व माध्यमिक शाळा व ज्युनिअर कॉलेज इत्यादी सोयी सुविधा आहेत. तालुक्याच्या गांवी छोटे व्यापारी, दुकानदार, व चहापाण्यासाठी हॉटेल्स आहेत. येथे आठवडा बाजार भरतो. सुरगाणा हे तालुक्याचे ठिकाण अजूनही विकसित जाणवत नाही. तालुक्यात रस्त्याबाबत काही अपवाद वगळता विकास झालेला नाही. बरेच रस्ते खडकाळ आहेत. एकंदरीत हा तालुका अविकसित म्हणता येईल.

सुरगाणा तालुक्यात शेकडा ९० टक्के लोक कोकणा या आदिवासी जमातीचे आहेत आणि शेकडा १० टक्के लोक महादेव कोळी या आदिवासी जमातीचे आहेत. या तालुक्यात इतर आदिवासी जमाती नाहीत.

सुरगाण्यात तालुक्याला १ प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. हे केंद्र नाशिक जिल्हा परिषदेच्या आरोग्य खात्यामार्फत चालविले जाते. १ ग्रामीण दवाखाना देखील आहे. उल्लेखित केंद्रात प्रशिक्षित, पदवीधारक वैद्यकीय अधिकारी आहेत. त्यांचे नियंत्रणाखाली आदिवासी भागात एकूण ६ उप आरोग्य केंद्र आहेत. तसेच पूर्ण तालुक्यात एकूण ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत.

शैक्षणिक सुविधांच्या दृष्टीने, तालुक्याला कनिष्ठ महाविद्यालय, माध्यमिक विद्यालय व प्राथमिक विद्यामंदिरे आहेत. तालुक्यात ९ शासकीय आश्रमशाळा व स्वयंस्फूर्त संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या ५ आश्रमशाळा आहेत. गावनिहाय अंगणवाड्या उघडण्यात आलेल्या आहेत. परंतु काही अति दुर्गम भागातील गावांत अंगणवाड्या नाहीत. हा अपवाद म्हणता येईल.

.....

## प्रकरण - २ रे

**डॉ. रेणू बी.पटेल, एकात्मिक बालविकास योजना सल्लागार व बालरोग तज्ञ, जे.जे. हॉस्पिटल, मुंबई-८ यांच्या सर्वेक्षण अहवालावरून दैनिक "लोकसत्ता" मुंबई या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली बातमी.**

डॉ. रेणू पटेल यांनी दिनांक ६ ते ८ जून, १९८८ या तीन दिवसात सुरगाणा तालुक्याचा दौरा केला. सुरगाणा तालुक्यातील एकूण ५ गावांना त्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन आदिवासी स्त्रिया व लहान मुले-मुली यांचे सर्वेक्षण करून त्यावर आधारीत अहवाल त्यांनी तयार केला. हा अहवाल त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाकडे दि. ११ जुलै १९८८ रोजी सादर केला. त्याची एक प्रत केंद्र शासनाच्या कल्याण मंत्रालयाकडेही त्यांनी सादर केली. या अहवालाच्या आधारे दिनांक २१ जुलै, १९८८ रोजी दैनिक "लोकसत्ता" मुंबई या मराठी वृत्तपत्रात श्री. नारायण तिवारी यांनी अनेकांचे लक्ष वेधणारी स्वटी ठळक बातमी दिली.

" सुरगाण्यात होतो, आदिवासी महिलांचा लिलाव !"...

डॉ. रेणू पटेल यांच्या मूळ अहवालात तिखट मीठ लावून व मूळ अहवालाबाबत कोणतीही शहानिशा न करता ही बातमी प्रक्षोभक पध्दतीने प्रसिध्द झाली. त्यामुळे आदिवासींमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. दैनिक "लोकसत्ता", मुंबई या वृत्तपत्रातील बातमीचे पडसाद मात्र राज्य विधानसभा व लोकसभेत उमटले. या भागातील स्थानिक दैनिकात बातम्या प्रसिध्द झाल्याने बरीच खळबळ उडाली.

**डॉ. रेणू पटेल यांच्या मूळ अहवालावरून श्री. नारायण तिवारी यांनी प्रसिध्दीस दिलेल्या बातमीतील महत्वाचे मुद्दे -**

१. आदिवासी स्त्रीयांचा बाजार आणि लिलाव-

" नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा या आदिवासी भागात आजही स्त्रीयांचा बाजार मांडला जातो. पन्नास-शंभर रुपयांना स्त्रीयांना या ठिकाणी लिलावात विकले जात असून या प्रकरणाची माहिती असूनही स्थानिक प्रशासन मात्र डोळे बंद करून बसले आहे."

२. मुले देणारी मशीन -

" सुरगाण्यातील आदिवासी स्त्रीयांना मुलांना जन्म देणाऱ्या एखाद्या मशिनचेच स्वरूप प्राप्त झाले आहे. जनावरांची किंमत लावतांना ज्याप्रमाणे उत्पादन शक्तीचा विचार लक्षात घेतला जातो त्याप्रमाणेच या बाजारात स्त्रीयांच्या प्रजनन क्षमतेनुसार तिची किंमत बोलली जाते. गरोदर असतांना आणि त्यानंतर सुमारे चाळीस दिवस स्त्रीचा लिलाव बंद असतो. तथापि, या काळातही तिचा पुढील खरेदीदार तिची किंमत पक्की करून ठेवतो. अत्यंत अल्प वयातच येथील आदिवासी तरुणी सहा-सात मुलांची माता बनते.

मुलांच्या वाढत्या संख्येला आळा घालण्यासाठी जेव्हा ह्या महिलांना कुटुंब नियोजनाचा सल्ला दिला तेव्हा त्यांनी "मग आम्हाला खरीदणार तरी कोण ?" असा प्रतिसवाल केला. केवळ संतान प्राप्तीसाठी तर आम्हाला पुरुष विकत घेतात. केवळ मुलांना जन्म देणारी मशीन म्हणूनच आमचा उपयोग होतो असे या महिलांनी सांगितले."

३. पुरुषांचा दहा वेळा/स्त्रीयांचा सहा-सात वेळा विवाह

" डॉ. पटेल यांनी सुरगाणा परिसरातील काही आदिवासी महिलांची भेट घेतली. या महिलांनीच सांगितल्याप्रमाणे या भागातील पुरुष किमान दहा वेळा तर स्त्रीया सहा-सात वेळा "विवाह" करतात. या विवाहाचा कोणताही समारंभ नसतो. ५०-१०० रुपयांना स्त्रीयांचा लिलाव होतो. पुरुषांकडे ५० किंवा १०० रुपये जमले की, तो जुन्या पत्नीलाच विकून नवी पत्नी खरेदी करण्याचा विचार करु लागतो. मुले सात वर्षांपर्यंत आपल्या आईकडे असतात, नंतर मात्र पित्याचा त्यांच्यावर हक्क राहतो."

४. जनावरांपेक्षाही वाईट वागणूक -

" या आदिवासी स्त्रीयांना जनावरांपेक्षाही वाईट वागणूक दिली जाते. वारंवार त्यांची "खरेदी-विक्री" चालू असल्यामुळे मानसिकदृष्ट्या त्या उद्ध्वस्त झालेल्या असतात. मुलांची स्थितीही यापेक्षा फारशी भिन्न नसते. त्यांच्या सुरक्षेकडे व पोषणाकडेही लक्ष दिले जात नाही. त्यामुळे या आदिवासींमध्ये कुटुंब नियोजनासारख्या मोहिमांचा योग्यरितीने प्रसार न झाल्यास परिस्थिती भयावह बनेल, अशी चिंता या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.

५. <u>मुलांची माहिती नसते</u> -

" आपल्या पत्नीला विकल्यानंतर सात वर्षांपर्यंत मुले तिच्याकडे ठेवली जातात, त्यानंतर त्यांचा बाप त्यांना घेऊन येतो. मुलगी तरुण झाली की, तिला विकून टाकतो, तर मुलास लाकडे तोडण्यासाठी जंगलात पाठवतो. सात वर्षांनंतर मातेला आपला मुलगा काय करतो आहे, याचीही माहिती राहत नाही."

६. <u>तरुण पत्नीचा हव्यास</u> -

" आदिवासी समाजाची सूक्ष्म पाहणी केली असता असे निदर्शनास आले की, सर्वांनाच आपली पत्नी तरुण असावी असे वाटते. मुलीने तारुण्यात पदार्पण केले की, शंभर रुपयांच्या बदल्यात त्यांना विवाहात विकले जाते. एक-दोन मुलांना जन्म दिल्यानंतर पुरुषाला आपल्या पत्नीचा कंटाळा येतो. मग एखादा "गरजूंचा" शोध घेऊन तो आपल्या पत्नीस विकून टाकतो व पुन्हा दुस-या यौवनेचा शोध घेऊ लागतो."

७. <u>संगोपनाकडे दुर्लक्ष</u> -

"पैशाची कमती आणि मुलांची आवड यांचे अनोखे मिश्रण याठिकाणी आढळते. मुलांची आवड विलक्षण असली तरी त्यांच्या संगोपनाकडे मात्र पूर्णतः दुर्लक्ष केले जाते. एक महिला आपल्या चार-पाच पतींपासून झालेल्या मुलांचे संगोपन करीत असते. शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नसल्यामुळे ही मुले लाकडे तोडण्याची कामे करतात. परिणामी या परिसरातील बहुमूल्य वनसंपत्तीचा ऱ्हास होऊ लागला आहे. या भागातील अर्थव्यवस्था ही लाकूडतोड आणि पावसाळी शेती यांच्याशी निगडीत असल्यामुळे फारशी उलाढाल होत नाही. ५०-१०० रुपयांचीही बचत करणे कठीण असल्यामुळे कदाचित स्त्रियांची खरेदी-विक्रीही त्याच प्रमाणात होत असावी."

८. <u>कुपोषण आणि उपासमार</u> -

"अल्प वयातच अनेक मुलांना जन्म दिल्यामुळे माता आणि मूल हे दोघेही उपासमारीचे बळी ठरतात. कुपोषण आणि तत्संबंधी रोगांचा प्रसारही येथे मोठ्या प्रमाणावर होत असतो. सहा वर्षांपर्यंतच्या मुलांची

दगावण्याची संख्याही खूप आहे. पावसाळ्यात हमखास होणारे रोगही अनेकदा जीवघेणे सिद्ध होतात. कुपोषणामुळे प्रसुतीकाळात दगावणाऱ्या मातांचीही संख्या येथे अन्यत्रापेक्षा दुप्पट आहे."

९. पिण्याच्या पाण्याची टंचाई -

"सुरगाणा परिसरातील हातरुंडी, खोकडाचे, तळपाडा, प्रतापगड, सुर्यगड व पालघर परिसरातील बोरांडा, कातकरवाडा, केळवाडी आदि भागातील ७४७१ लोकांशी डॉ. पटेल यांनी संपर्क साधला. पिण्याच्या पाण्याची येथे भीषण टंचाई असून विहिरीतून पाणी आणण्यासाठी दोन-चार कि.मी. ची दररोज पायपीट करावी लागते. उन्हाळ्यात तर या विहिरीही आटतात. त्यामुळे उन्हाळ्यात हे लोक आंघोळही करत नाहीत व कपडेही धूत नाहीत. केवळ स्वयंपाकासाठी व पिण्यासाठी पाणी कुठून तरी मिळवले जाते."

१०. दयनीय अवस्था -

"अहवालानुसार महिला वर्षभर प्रामुख्याने श्रम करतो. पुरुष संबंध दिवस बसून काढतात. अगदीच वेळ पडल्यास जंगलातून लाकडे आणतात. या परिसरातील आदिवासींची अवस्था अत्यंत दयनीय आहे. डाळी, भाजीपाला, तेल यांचा वापर अन्नात नसतोच. पोटभर अन्न कधीच मिळत नसल्यामुळे साहजिकच त्यांचा आहारही कमीच आहे. या क्षेत्रातील कुपोषणाचे प्रमाण १६.७ ते ५५.२ टक्के एवढे आहे. मुलांच्या कुपोषणाचे प्रमाण अधिक असून या प्रकरणी त्वरित ठोस अशी पावले उचलली नाहीत तर हे प्रमाण आणखी वाढण्याची भिती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे."

....

## प्रकरण - ३ रे

## सर्वेक्षण अहवाल

डॉ. रेणू बी. पटेल यांनी सुरगाणा, जिल्हा-नाशिक या विभागातील आदिवासी स्त्रीया व मुली यांचे सर्वेक्षण करुन तयार केलेला अहवाल व त्या अहवालाआधारे दि. २१ जुलै, १९८८ रोजी श्री. नारायण तिवारी यांनी दैनिक "लोकसत्ता" मुंबई या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या बातमीबाबत संस्थेचे अभिप्राय शासनाला पाठविण्यासाठी या भागाचा दौरा करुन स्थानिक आदिवासींकडून आवश्यक ती माहिती मिळविण्यासाठी तेथील वास्तव परिस्थितीचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.

डॉ. रेणू पटेल यांच्या मूळ अहवालावरुन प्रसिध्दीस आलेल्या बातमीबाबत चौकशीसाठी संस्थेतील अधिकारी त्या क्षेत्रात पोहोचेपर्यंत मा. अतिरिक्त आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळवण, आदिवासी विकास अधिकारी, कळवण, सुरगाणा प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्याधिकारी, शिक्षणाधिकारी, समाजकल्याण सभापती जिल्हा परिषद, नाशिक विविध आदिवासी समाज कार्यकर्ते, त्या क्षेत्रात काम करणा-या स्वयंस्फूर्त संस्थांचे कार्यकर्ते इत्यादी शासकीय/अशासकीय अधिकारी व सदस्यांनी डॉ. रेणू पटेल यांनी भेटी दिलेल्या ५ गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्या संदर्भात माहिती मिळविली असल्याचे कळले. बातमीचा परिणाम म्हणून शासकीय अधिका-यांची एवढी धावपळ पाहून आदिवासींना आश्चर्य वाटत होते व ते तसेच प्रगट करत होते. त्यामुळे सर्वेक्षणाच्या कामात अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. तथापि आदिवासी संशोधन संस्थेच्या अधिका-यांनी तेथील आदिवासी "कोकणी" बोलीभाषेचा आवश्यकतेनुसार वापर करुन लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला व अनेक गावक-यांशी/कुटुंब प्रमुखांशी समक्ष चर्चा करुन माहिती मिळविली.

डॉ. पटेल यांनी भेटी दिलेल्या ५ गावांचे सर्वेक्षण काम हे नमुना पध्दतीने (Sampling Method) केले. या गावांतून कुटुंबांना भेटी देऊन माहिती मिळविली व हा प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न केला.

| अ.क्र. | गावाचे नांव | कुटुंबांना भेटी व त्याची माहिती. |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | हतरंडी | ११ |
| २. | प्रतापगड | १२ |
| ३. | सुर्यगड | १३ |
| ४. | तव्पाडा | १२ |
| ५. | घोडावे | १२ |
| | एकूण- | ६० |

उपरोल्लेखित ५ गावांपैकी "हतरंडी, प्रतापगड, सुर्यगड ही ३ गांवे सुरगाणा तालुक्याच्या दक्षिणेस सुरगाणा व्हाया पळसन मार्गे पेठ तालुका या रस्त्यावरील आहेत. ही तिन्ही गांवे चोहोबाजूंनी डोंगर, टेकड्यांनी वेढलेली आहेत. पैकी हतरंडी" हे गांव चोहोबाजूंनी हिरव्या वनराईने डोंगराच्या मध्यभागी वसलेले आहे. उल्लेखित मार्गावर ही तिन्ही गांवे १½ ते २ कि.मी. अंतराने वसली आहेत.

"तव्पाडा" हे गांव सुरगाणा तालुक्याच्या अगदी पूर्वेस ३½ कि.मी. अंतरावर आहे. सुरगाणा ते बोरगांव फाटा या रस्त्याने सुरगाण्याहून निघाल्यावर २ कि.मी. अंतरावर कच्चा रस्ता थेट तव्पाडावरुन पुढे जातो. तव्पाडा हे गांव टेकड्यांवर वसलेले असल्याने या गावांहून सुरगाणा तालुका [शहर] स्पष्टपणे दिसतो.

"घोडावे" हे गांव सुरगाणा ते बोरगांव फाटा या डांबरी रस्त्यावर सुरगाण्याच्या पूर्व दक्षिणेस [आग्नेय] दिशेस सुमारे १२ कि.मी. अंतरावर वसलेले आहे. "बोरगांव फाटा [नाशिक ते सुरत राष्ट्रीय महामार्गावरील] हून पश्चिमेस १½ कि.मी. अंतरावर "घोडावे" गांव आहे.

एकंदरीत उपरोल्लेखित ५ ही गांवे शहरी, अति दुर्गम भागांत आहेत व त्यांच्याशी संपर्क साधता येत नाही. किंवा येथील लोकांशी बाहेरच्या जनतेचा संपर्क येत नाही असे म्हणता येणार नाही.

२. अनुसूचित जमात :-

सर्वेक्षण केलेल्या ५ गावांतील एकूण ६० कुटुंबांची माहिती घेतली, त्या आधारे आदिवासी कुटुंबाची जमातीनिहाय संख्या खालीलप्रमाणे आढळून आली.

| अ.नं. | जमातीचे नांव | कुटुंब संख्या |
|---|---|---|
| १. | कोकणा | ५४ |
| २. | महादेव कोळी | ६ |
| | एकूण- | ६० |

उल्लेखित ५ गावांत आदिवासी जमातीपैकी शेकडा ९० टक्के "कोकणा" या जमातीचे लोक राहतात आणि शेकडा १० टक्के "महादेव कोळी" या जमातीचे लोक आहेत. या जमाती व्यतिरिक्त अन्य आदिवासी जमातीची कुटुंबे गावांत आढळून आली नाहीत.

सर्वेक्षण केलेल्या ५ गावांत कोकणा ही प्रमुख आदिवासी जमात असल्याने "महादेव कोळी" ही जमात अल्प प्रमाणांत असल्याने या जमातीचे लोक "कोकणा" जमातीच्या लोकांप्रमाणेच वेशभूषा करतात. बोलीभाषा, रूढी, परंपरा, लग्न कार्यपद्धती, मूल जन्मल्यानंतर करण्यात येणा-या पारंपारिक रूढी, कार्यक्रम, देवाण-घेवाण पध्दती इत्यादी एकंदरीत सर्व रूढी, परंपरा स्विकारलेल्या आहेत व दोन्ही जमातीत त्या ब-याच सारख्या आहेत. त्यामुळे उपरोक्त अवलोकनावरून जमातीनिहाय पुरूष/स्त्रिया ओळखणे शक्य होत नाही.

३. व्यवसाय-

सर्वेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबांची व्यवसायनिहाय संख्या खालीलप्रमाणे आढळून आली -

| अ.नं. | व्यवसाय | कुटुंबांची संख्या |
|---|---|---|
| १. | फक्त शेती करणारे | ४६ |
| २. | फक्त शेत व वन मजुरी करणारे | ६ |
| ३. | शेती व वन मजुरी करणारे | ८ |
| | एकूण- | ६० |

सर्वेक्षण केलेल्या ५ गावांतील एकूण ६० कुटुंबांपैकी शेती करणारे एकूण ४६ कुटुंबे आहेत. फक्त शेत व वन मजुरीवर उदरनिर्वाह करणारी एकूण ६ कुटुंबे आहेत. ज्यांना शेती आहे, परंतु "अल्प भूधारक" मध्ये मोडतात. त्यांची शेती असूनही वर्षभर पुरेल एवढेही उत्पन्न शेतीतून निघू शकत नाही अशी कुटुंबे एकूण ८ असून हे उदरनिर्वाहासाठी हंगामी शेत व वन मोलमजुरी किंवा मिळेल त्या कामावर गुजराण करतात. या गावामध्ये व्यापार, दुकानदारी, नोकरी इ. अन्य व्यवसाय करणारे एकही कुटुंब आढळले नाही.

६० कुटुंबांपैकी सुमारे २५ कुटुंबे आपल्या दैनंदिन व्यवसायात जोडधंदा म्हणून गाई, म्हशी, शेळ्या, कोंबड्या पाळतात. त्या आधारे त्यांच्या दैनंदिन गरजांची तोंड मिळवणी थोड्याफार प्रमाणात होऊ शकते.

४. वार्षिक उत्पन्न :-

सर्वेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबांची अंदाजे वार्षिक उत्पन्ननिहाय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | वार्षिक उत्पन्न | कुटुंबांची संख्या |
|---|---|---|
| १. | ० ते १,००० रुपया पर्यंत ... | २८ |
| २. | १,००० ते ५,००० रुपया पर्यंत ... | १७ |
| ३. | ५,००० ते १०,००० रुपया पर्यंत ... | १५ |
| | एकूण ... | ६० |

सर्वेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबांपैकी ज्यांचे वार्षिक उत्पन्न १,००० रुपया पर्यंत आहे अशी २८ कुटुंबे आढळली. १,००० ते ५,००० रुपये पर्यंत उत्पन्न असणारी १७ कुटुंबे आढळली. ही कुटुंबे परिस्थितीने गरीब आहेत. ५,००० ते १०,००० रुपया पर्यंत उत्पन्न गटात असलेले एकूण १५ कुटुंबे आढळली. यांचा उदरनिर्वाह, जीवनावश्यक गरजा कशातरी ते भागवतात.

५. जमीन -

सर्वेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबाची स्वतःच्या मालकीची जमीन पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एकर | कुटुंबाची संख्या |
|---|---|---|
| १. | ३ एकर पर्यंत | २२ |
| २. | ३ ते ५ एकर पर्यंत | २२ |
| ३. | ५ एकराच्या वर | ८ |
| ४. | भूमिहीन | ८ |
| | एकूण ... | ६० |

सर्वेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबापैकी ३ एकरापर्यंत जमीन असलेली २२ कुटुंबे आढळली. ही कुटुंबे "अल्प भूधारक" म्हणता येईल. या कुटुंबांची शेती असूनही त्यांच्या शेतीतून वर्षभर पुरेल एवढेही उत्पादन होत नसल्याने वर्षाची तोंडमिळवणी करण्यासाठी मिळेल तिथे, मिळेल ती मजूरीही करतात. ३ ते ५ एकरापर्यंत जमीन असलेले एकूण २२ कुटुंबे आढळलीत, तसेच ५ एकराच्या पुढे जमीन असलेले एकूण ८ कुटुंबे आढळलीत. ही कुटुंबे शेती व्यवसाय करतात.

६. कुटुंबातील व्यक्ती -

सर्वेक्षण केलेल्या एकूण ६० कुटुंबातील व्यक्तींची माहिती खालील प्रमाणे आहे-

| सर्वेक्षण केलेले एकूण कुटुंबे | कुटुंबातील व्यक्ती | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | | एकूण | स्त्रिया | | एकूण | |
| | १४ वर्षा खालील | १४ वर्षा वरील | | १४ वर्षा खालील | १४ वर्षा वरील | | |
| ६० | ७१ | १०७ | १७८ | ६१ | ९३ | १५४ | |
| | | एकूण- | १७८ | + | | १५४ = | ३३२ |

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील एकूण ३३२ पुरुष/स्त्रिया आहेत. त्यापैकी पुरुष एकूण १७८ आणि स्त्रिया एकूण १५४ आढळून आल्यात. एकूण १७८ पुरुषांपैकी ७१ पुरुष १४ वर्षांखालील असून १०७ पुरुष १४ वर्षांवरील आहेत. एकूण १५४ स्त्रियांपैकी ६१ स्त्रिया ह्या १४ वर्षां खालील असून ९३ स्त्रिया ह्या १४ वर्षांवरील आहेत. एकूण ३३२ पुरुष/स्त्रियांच्या संख्येवरुन त्यांची टक्केवारी याप्रमाणे आहे.

(अ) १४ वर्षां खालील स्त्रियांपेक्षा १४ वर्षांखालील पुरुष १० टक्क्यांनी जास्त आहेत.

(ब) १४ वर्षां वरील स्त्रियांपेक्षा १४ वर्षांवरील पुरुष १४ टक्क्यांनी जास्त आहेत.

(क) एकूण स्त्रियांपेक्षा पुरुष २४ टक्क्यांनी जास्त आहेत.

७. <u>विवाहीत पुरुष आणि स्त्रिया</u>-

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील विवाहीत पुरुष आणि स्त्रियांची माहिती खालीलप्रमाणे आढळली.

| अ.क्र. | विवाहीत पुरुष / स्त्रिया | विवाह संख्या | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ला | २ रा | ३ रा | ३ पेक्षा जास्त | |
| १. | पुरुष | ७४ | ९ | १ | - | ८४ |
| २. | स्त्रिया | ७२ | ८ | - | - | ८० |
| | एकूण - | १४६ | १७ | १ | - | १६४ |

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील एकूण १६४ पुरुष/स्त्रिया विवाहीत आहेत. त्यापैकी पुरुष ८४ आहेत, तर स्त्रिया ८० आहेत. म्हणजेच विवाहीत पुरुषांपेक्षा विवाहीत स्त्रिया ह्या ४ टक्यांनी कमी आहेत.

१ ला विवाह झालेले पुरुष ७४ असून स्त्रिया ७२ आहेत, दुसरा विवाह झालेले पुरुष ९ असून स्त्रिया ८ आहेत, तसेच तिसरा विवाह झालेला फक्त १ पुरुष असून ३ पेक्षा जास्त विवाह झालेला एकही पुरुष आढळला नाही. स्त्रियांच्या बाबतीत ३ रा विवाह किंवा ३ पेक्षा जास्त विवाह झालेली एकही स्त्री आढळली नाही.

पुरुष आणि स्त्रियांच्या १ ला व २ रा विवाह झालेली संख्या लक्षात घेता विवाहीत पुरुष/स्त्रियांचे प्रमाण १ किंवा २ टक्यांनी तफावत आढळते. महत्वाचे म्हणजे १ ला विवाह झालेले पुरुष आणि स्त्रिया यांचे प्रमाण शेकडा ९० टक्के आहे. तसेच दुसरा विवाहाचे प्रमाण शेकडा ९ टक्के आहे आणि ३ रा किंवा ३ पेक्षा जास्त विवाह झालेले पुरुष फक्त शेकडा १ टक्यांनी जास्त आहे.

थोडक्यात- [अ] गावनिहाय उदाहरणादाखल एक-दोन पुरुष किंवा स्त्रियांचे ३ किंवा ३ पेक्षा अधिक विवाह केलेले असण्याची शक्यता आहे.

[ब] पुरुष किमान १० वेळा व स्त्रिया किमान ७ वेळा विवाहबध्द होतात हे डॉ. रेणू पटेल यांचे मत मान्य होण्यासारखे नाही. उलट ते गैरसमज पसरविणारे वाटते.

८. <u>अविवाहीत पुरुष आणि स्त्रिया</u> -

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील अविवाहीत पुरुष आणि स्त्रियांची माहिती खालीलप्रमाणे आहे-

| अ.नं. | अविवाहीत पुरुष/स्त्रिया | एकूण |
|---|---|---|
| १. | पुरुष ... | ८३ |
| २. | स्त्रिया ... | ८५ |
| | एकूण - | १६८ |

६० कुटुंबातील एकूण ३३२ पुरुष/स्त्रियांपैकी एकूण १६८ पुरुष/स्त्रिया अविवाहीत असल्याचे आढळले. त्यापैकी अविवाहीत पुरुष ८३ आहेत तर अविवाहीत स्त्रिया ८५ आहेत. कोठेही पुरुष-स्त्री संख्येत असमतोलपणा असल्याचे आढळत नाही.

अविवाहीत पुरुष आणि स्त्रियांची संख्या लक्षात घेता सर्व पुरुष आणि स्त्रिया विवाहास आवश्यक वयोमनाची किंवा वयात आलेली आढळली नाहीत. त्यात शेकडा ७५ टक्के बालवयातील आहेत. पैकी बरीच मुले/मुली सध्या शिक्षण घेत आहेत. शेकडा २० टक्के तरुण मुले आणि

मुली आहेत आणि शेकडा ५ टक्के तारुण्यात आलेली मुले. मुली आर्थिक शेयत नसल्याने तथा अविवाहीत असल्याचे सर्वेक्षणातून आढळून आले आहे.

९. <u>विवाहाच्या वेळेचे वय</u> :-

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील विवाहीत पुरुष आणि स्त्रियांचे विवाहाच्या वेळेचे वय -

| अ.नं. | विवाहाचे वेळेचे वय | पुरुष | स्त्रिया | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | १० वर्षापर्यंत | - | २ | २ |
| २. | ११ ते १४ वर्षापर्यंत | १ | ६ | ७ |
| ३. | १४ ते १६ वर्षापर्यंत | १३ | ३० | ४३ |
| ४. | १६ ते २० वर्षापर्यंत | ३९ | ३९ | ७८ |
| ५. | २० वर्षांच्या पुढे | ३१ | ३ | ३४ |
| | | एकुण - ८४ | + ८० | = १६४ |

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबात विवाहीत पुरुष ८४ आणि विवाहीत स्त्रिया ८० असे एकुण १६४ विवाहीत आहेत. त्यांच्या विवाहाच्या वेळेचे वय लक्षात घेता पुरुष आणि स्त्रियांची संख्या याप्रमाणे आढळून आली.

अ) १० वर्षापर्यंत वय असताना विवाह झालेला एकही पुरुष नाही तर स्त्रिया फक्त २ आढळल्या.

ब) ११ ते १४ वर्षापर्यंत वय असताना विवाह झालेला फक्त १ पुरुष आणि स्त्रिया ६ आढळल्यात.

क) १४ ते १६ वर्षापर्यंत वय असताना विवाह झालेले १३ पुरुष आणि ३० स्त्रिया आढळल्यात.

ड) १६ ते २० वर्षापर्यंत वय असताना विवाह झालेले ३९ पुरुष आणि ३९ स्त्रिया आढळल्यात.

इ) २० वर्षांच्या पुढे वय असताना विवाह झालेले ३१ पुरुष आणि फक्त ३ स्त्रिया आढळल्यात.

एकंदरीत अल्पवयात लग्न झालेले गांवनिहाय उदाहरणादाखल एक-दोन पुरुष आणि स्त्रिया असण्याची शक्यता आहे. वयाच्या १४ व्या ते १६ व्या वर्षापर्यंत लग्न झालेल्या पुरुष आणि स्त्रियांची संख्या एकूण ५३ आहे. तथापि, या उल्लेखित वयोमानात लग्न झालेले पुरुष आणि स्त्रिया शक्यतो सध्या वयस्कर आहेत. म्हणजेच पूर्वी आदिवासींमध्ये प्रौढावस्था सुरु होताच विवाह होत असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामानाने अलिकडील तरुण पिढीतील विवाहीत पुरुष आणि स्त्रियांच्या लग्नाची वयोमर्यादा काही अपवाद वगळता १६ ते २२ वर्षे असल्याचे आढळून आले. क्वचित एक, दोन स्त्रिया किंवा पुरुष हे विवाह करण्याची अपेक्षा अजूनही "लग्नखर्च" करण्याची ऐपत नसल्याने वयाच्या ३० वर्षांच्या पुढे केवळ "पेन" भरुन (साखरपुडा) करुन गांवपंचांच्या संमतीने लग्नाशिवाय संसार करताना आढळून आले.

१०. <u>विवाहाचा खर्च</u> -

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबातील विवाहाचा (पुरुषाच्या) अंदाजे खर्च-

| अ. नं. | विवाहाचा अंदाजे खर्च | विवाहीत पुरुष |
|---|---|---|
| १. | १०० ते ५०० रु. पर्यंत | ६ |
| २. | ५०० ते १,००० पर्यंत | १७ |
| ३. | १,००० ते ५,००० पर्यंत | ६१ |
| | एकूण - | ८४ |

एकूण विवाहीत पुरुष ८४ असून त्यांच्या विवाहाच्या अंदाजे खर्चानुसार संख्या खालीलप्रमाणे आहे.

अ) १०० ते ५०० रु. पर्यंत खर्चात लग्न झालेले फक्त ६ पुरुष आढळले. हे पुरुष सध्या वयस्कर आहेत. पूर्वी देज रक्कम ४० ते ५० रुपया पर्यंत होती आणि महागाई नव्हती. त्यामुळे अल्प खर्चात लग्न झालेले निष्पन्न झाले.

ब] ५०० ते १,००० पर्यंत खर्चात लग्न झालेले एकूण १७ पुरुष आढळलेत. हे पुरुष मध्यम वयाचे होते. नंतर देहेज रक्कम थोडी वाढली तसेच महागाई ही वाढत गेली त्यामुळे लग्नखर्च ओघानेच वाढला.

क] १,००० ते ५,००० रु. पर्यंत खर्चात लग्न झालेले एकूण ६१ पुरुष आढळलेत. ही पुरुष मंडळी अलिकडे लग्न झालेली असावीत.

पुरुषांप्रमाणे विवाहीत स्त्रियांच्या माहेरकडेही लग्नखर्च झालेला असतो. परंतु तो खर्च विवाहीत पुरुषांच्या खर्चाच्या मानाने अत्यल्प प्रमाणात असतो. कारण कोणत्याही आदिवासी जमातीत काही सुशिक्षित कुटुंबांचा अपवाद वगळता आदिवासीत्तेर समाजाप्रमाणे "हुंडापध्दत" अस्तित्वात नाही. त्यांच्यात "देहेज" पध्दत रुढ आहे. या पध्दतीत मुलांच्या वडिलांकडून मुलींच्या वडिलांस "देन" [साखरपुडयात] ठरलेला "देहेज" [पैसे आणि धान्य] या स्वरुपात द्यावे लागतात. त्यामुळे मुलींच्या वडिलांपेक्षा मुलांच्या वडिलांनाच जास्त खर्च [देहेजप्रमाणे] करावा लागतो. म्हणूनच याठिकाणी पुरुष मंडळींचा लग्नाचा अंदाजे खर्च विचारार्थ घेण्यात आला आहे.

११. विवाहीत पुरुषांनी दिलेला देहेज -

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील विवाहीत पुरुषांनी दिलेल्या देहेजा [देज] संदर्भात मिळालेली माहिती.

| अ.नं. | देहेज रक्कम | विवाहीत पुरुष |
|---|---|---|
| १. | ५० ते १०० रुपये | १० |
| २. | १०० ते ३०० रुपये | ३० |
| ३. | ३०० ते ६०० रुपये | ३३ |
| ४. | ६०० पेक्षा अधिक | ८ |
| ५. | देहेज न दिलेले/घरजावई | ३ |
| | एकूण- | ८४ |

उपरोल्लेखित आकडेवारी लक्षात घेता एकूण ८४ विवाहीत पुरूषापैकी १० पुरूषांनी ५० ते १०० रूपयापर्यंत देहेज दिल्याचे आढळले. ३० पुरूषांनी १०० ते ३०० रूपयापर्यंत, ३३ पुरूषांनी ३०० ते ६०० रूपया पर्यंत, तर ८ पुरूषांनी रूपये ६०० पेक्षा अधिक देहेज रक्कम दिल्याचे समजले.

एकूण ८४ विवाहीत पुरूषापैकी फक्त ३ पुरूषांनी देहेज न दिल्याचे आढळले. कारण ते घरजावई म्हणून मुलींच्या घरीच राहत होते. ज्या आदिवासी पुरूषांना देहेज रक्कम देणे, लग्नखर्च करण्याचीही ऐपत नाही असा गरीब तरूण मुलास, ज्यांना फक्त मुलीच आहेत मुलगा वारसदार वगैरे कोणी नाही असे आदिवासी लोक "घरजावई" म्हणून आपल्याच घरी शेती कामासाठी, घरकामासाठी ठेवून घेतात. असा संबंधित मुलीचे वडिलच सर्व लग्नखर्च करतात. मुलाची तर आर्थिक खर्चाची ऐपत नसल्याने तो उर्वरित आयुष्य मुलीच्या वडिलांकडेच राबत राहून कंठीत असतो.

ह्या लग्नप्रकारास ब-याच आदिवासी जमातीत गांवपंचायतीकडून मान्यता देण्यात येते. अर्थात यात दोहोबाजूकडील हेतू साध्य होतात त्यामुळे ही पध्दत सर्वमान्य आहे.

१२. <u>शिक्षण</u>-

सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबातील अशिक्षित आणि सुशिक्षित पुरूष स्त्रियांची माहिती खालीलप्रमाणे आहे -

| अ.नं. | अशिक्षित/सुशिक्षित | पुरूष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | अशिक्षित | ९१ | ११३ | २०४ |
| २. | सुशिक्षित | ८७ | ४१ | १२८ |
| | | एकूण- | | ३३२ |

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबातील एकूण ३३२ पुरूष/स्त्रियांपैकी अशिक्षित पुरूष/स्त्रियांची संख्या लक्षात घेता एकूण २०४ पैकी ९१ पुरूष आणि ११३ स्त्रिया अशिक्षित आढळल्या. तसेच एकूण १२८ सुशिक्षितांपैकी ८७ पुरूष तर ४१ स्त्रिया सुशिक्षित आढळल्या.

अशिक्षितांमध्ये पुरुषापेक्षा स्त्रिया जास्त आहेत. सुशिक्षितांमध्ये पुरुषापेक्षा स्त्रियांचे निम्मे प्रमाण आढळले. सुशिक्षित पुरुष आणि स्त्रियांमध्ये काही अपवाद वगळता मध्यम वयातील, तरुण पिढीतील, बालवयातील मुले, मुली आणि पुरुष-स्त्रियांचे प्रमाण शेकडा ९० टक्के आहे. पैकी शेकडा ७० टक्के लहान मुले आणि मुली यांचे प्रमाण आहे. अर्थात अलिकडे शासकीय आश्रमशाळा, स्वयंस्फूर्त संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळा, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाच्या सुखसुविधामुळे आणि शिक्षणाचे महत्व आता आदिवासींना देखील पटू लागल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढीस लागले आहे.

सुशिक्षित पुरुष आणि स्त्रिया यांची शिक्षणानिहाय संख्या दर्शविणारी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | शिक्षण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | बालवाडी, इ. १ ली ते ४ थी पर्यंत | ५२ | २३ | ७५ |
| २. | इ. ५ वी ते इ. ८ वी पर्यंत | २० | ११ | ३१ |
| ३. | इ. ९ वी ते इ. १० वी पर्यंत | ११ | ५ | १६ |
| ४. | इ. ११ वी च्या पुढे ... | ४ | २ | ६ |
| | एकूण - | ८७ | ४१ | १२८ |

सर्वेक्षण केलेल्या कुटुंबातील एकूण १२८ सुशिक्षित पुरुष आणि स्त्रियांच्या शिक्षणानिहाय उपरोल्लेखित आकडेवारीवरून असे आढळून येते की,

[अ] स्त्रियापेक्षा पुरुषाचे शिक्षणाचे प्रमाण दुप्पट आहे.

[ब] शिक्षणाची पायरी एकेक करांनी वाढत जाते. त्याप्रमाणे स्त्री, पुरुषांच्या शिक्षणाचे प्रमाण घटत गेलेले दिसून येते. उदा. इ.५ वी ते इ. ८ वी पर्यंत शिक्षण झालेले/शिकणारे पुरुष आणि स्त्रीया अनुक्रमे २० आणि ११ एवढे आहेत. तर इ. ११ वी च्या पुढे शिक्षण झालेले/शिकणारे पुरुष आणि स्त्रिया यांचे प्रमाण अनुक्रमे फक्त ४ आणि २ एवढेच आहे.

(क) शेकडा ७५ टक्के पुरुष आणि स्त्रिया सध्या शिक्षण घेत आहेत तर शेकडा २५ टक्के पुरुष आणि स्त्रिया ह्यांनी शिक्षण अर्धवट सोडून दिले आहे.

(ड) सध्या शिक्षण घेणाऱ्यात ७० टक्के १४ वर्षां खालील मुले आणि मुली आहेत तर ५ टक्के १४ वर्षांवरील मुले आणि मुली आहेत.

वरील माहिती आदिवासी कुटुंबांची सद्यस्थिती कशाप्रकारची आहे हे समजावून घेण्यासाठी महत्वाची आहे.

....

## प्रकरण ४ थे

## सर्वेक्षण पाहणीतील निष्कर्ष

**आदिवासी :-**

सुरगाणा तालुका हा नाशिक जिल्ह्यातील मागासलेला तालुका आहे. त्यात सुमारे ९१ टक्के लोक आदिवासी जमातीचे आहेत. तालुक्यात शेकडा ९० टक्के लोक "कोकणा" या आदिवासी जमातीचे आहेत. तर उरलेल्या १० टक्क्यात "महादेव कोळी" व इतर जाती जमातीचे लोक आहेत. या दोन जमाती व्यतिरिक्त या तालुक्यात इतर आदिवासी जमाती नाहीत.

सुरगाणा तालुक्यात प्रामुख्याने कोकणा जमातीची लोकसंख्या असल्याने या भागात आढळून येणाऱ्या महादेव कोळी, जमातीच्या लोकांनी देखील "कोकणी" बोलीभाषा, वेशभूषा, मूल जन्मल्यावर करण्यात येणाऱ्या रूढी, लग्नपद्धती व त्यासंबंधीचे कार्यक्रम, देवदेवता, पूजाविधी, अंत्यसंस्कारपद्धती इ. सर्व पारंपारिक रूढी, हे पारंपारिक कार्यक्रम कोकणा जमातीच्या प्रमाणेच स्वीकारलेले आहेत. त्यामुळे केवळ वरकरणी अवलोकनावरून उल्लेखिलेल्या दोन भिन्न जमातीतील स्त्री/पुरुषातील फरक करणे कठीण वाटते.

डॉ. रेणू पटेल यांनी भेटी दिलेली ५ गावे, "हतगड, प्रतापगड, सुर्गाड, तळपाडा आणि बाडोधे" हा संकतील गावे असल्याने ती अति दुर्गम भागातील गावे आहेत असे म्हणता येणार नाही. ह्या पांचही गांवांना कार्य असून देखील संपर्क साधणे अजिबात अवघड नाही. कारण फक्त "तळपाडा" ह्या गांवी सुरगाण्यापासून पोहचण्यासाठी निम्मे अंतर गाडीचा रस्ता असून निम्मे अंतर कच्चा टणक रस्ता आहे. या व्यतिरिक्त अन्य ४ गावे ही गाडीच्या रस्त्यावरील आहेत. त्यामुळे बारामाही उल्लेखित गांवांना पायी वा स्वयंचलित वाहनाने सहज संपर्क साधता येतो.

**व्यवसाय : जमीन व उत्पन्न :-**

उपरोल्लेखित ५ गांवातील आदिवासींचा व्यवसाय मुख्यतः शेती

(१) फक्त शेती करणारे, (२) शेती सांभाळून ती शेती व वन मजुरी करणारे आणि (३) फक्त शेती व वन मजुरी करणारे गट आढळून येतात. पैकी शेकडा ७० टक्के लोक शेती करणारे आहेत. शेकडा २० टक्के लोक शेती व वनमजुरी करणारे आहेत. तर अन्य शेकडा १० टक्के लोक हे फक्त शेती व वन मजुरीवरच उपजीविका करणारे आहेत. तसेच उल्लेखित तिन्ही प्रकारातील लोक काही अपवाद वगळता आपल्या मूळ व्यवसायास जोडधंदा म्हणून रिवाजाप्रमाणे "कोंबड्या, शेळ्या, गाई आणि म्हशी" पाळतात. याद्वारे त्यांना काही प्रमाणात दैनंदिन खर्चाची तोंड मिळवणी करणे शक्य होते.

या भागातील आदिवासींचे वार्षिक उत्पन्न लक्षात घेता असे निदर्शनास येते की, सरासरी रु.१००० ते ५००० रु.पर्यन्त उत्पन्न असलेली कुटुंबे अधिक आहेत. ती सर्वच गरीब परिस्थितीतील आहेत. त्यांच्या या उत्पादनातून त्यांना जीवनावश्यक सर्व गरजा भागविणे शक्य होत नाही. त्यामुळे या उत्पन्न गटातील कुटुंबे ही "गरीब कुटुंबे" म्हणता येईल.

या भागातील आदिवासींमध्ये मालकीची जमीन नसल्याचे प्रमाण कमी आहे. उदा. (सर्वेक्षण केलेल्या ६० कुटुंबात फक्त ८ कुटुंबे "भूमिहीन" आहेत.) बाकी शेकडा ९५ टक्के कुटुंबे स्वतःच्या मालकीची जमीन असलेली आहेत. पैकी शेकडा ३७ टक्के कुटुंबे सरासरी १ ते ३ एकरापर्यन्त जमीन असलेली "अति अल्प भूधारक" कुटुंबे म्हणता येईल.

ज्यांना स्वतःच्या मालकीची जमीन ३ ते ५ एकरापेक्षा जास्त असणारी कुटुंबे या भागात शेकडा २७ टक्के आढळून येतात. एकंदरीत या भागातील आदिवासींना जमीन अति अल्प/अल्प असा फरक तर आहेच परंतु काही अपवाद वगळता बहुतांशी शेती ही खडकाळ, दगडगोट्यांची, डोंगर उतारावर असलेली जोडव्यात निकृष्ट स्वरूपाची आहे. त्यामुळे त्यांच्या जमिनीच्या आकारमानानुसार उत्पन्नात वाढ जाणवत नाही.

<u>स्त्री-पुरुष प्रमाण : विवाह प्रमाण</u> :-

या भागातील आदिवासी कुटुंबातील एकूण व्यक्तींची संख्या लक्षात घेता, पुरुषांचे प्रमाण, स्त्रियांपेक्षा शेकडा २० टक्के जास्त आहे.

तसेच १४ वर्षाखालील स्त्रियांपेक्षा, १४ वर्षाखालील पुरुषांचे प्रमाण शेकडा १० टक्के जास्त आहे. आणि १४ वर्षावरील स्त्रियांपेक्षा १४ वर्षावरील पुरुषांचे प्रमाण शेकडा १४ टक्क्यांनी जास्त आहे.

सुरगाण्यातील आदिवासी पुरुष आणि स्त्रियांचा विवाह लक्षात घेता विवाहीत पुरुषांचे प्रमाण हे विवाहीत स्त्रियांपेक्षा ४ टक्क्यांनी कमी आहे. <u>पहिला विवाह झालेले पुरुष आणि स्त्रिया यांचे प्रमाण शेकडा ९० टक्के आहे. तसेच दुसरा विवाह झालेले पुरुष आणि स्त्रिया यांचे प्रमाण शेकडा ६ टक्के आहे. आणि तिसरा किंवा ३ पेक्षा जास्त विवाह झालेले केवळ पुरुषांचे प्रमाण शेकडा १ टक्के आहे</u>.

उदा. (सर्वेक्षण केलेल्या ८० कुटुंबातील एकूण १६४ विवाहीत पुरुष आणि स्त्रिया यांत १ ला विवाह झालेले ७७ पुरुष व ७२ स्त्रीया आहेत. २ रा विवाह झालेले ९ पुरुष व ८ स्त्रिया आहेत आणि ३ रा विवाह झालेला फक्त १ पुरुष असून ३ पेक्षा जास्त विवाह झालेला एकही पुरुष नाही. ~~स्त्रियांच्या बाबतीत ३ रा विवाह झालेला एकही पुरुष नाही.~~ स्त्रियांच्या बाबतीत ३ रा विवाह किंवा ३ पेक्षा जास्त विवाह झालेली एकही स्त्री आढळली नाही.)

अविवाहीत पुरुष आणि स्त्रिया यांचे जवळपास समप्रमाण आढळून येते. मुख्यत: अविवाहीत पुरुष आणि स्त्रिया यात शेकडा ७५ टक्के बालवयातील मुले आणि मुली यांचे प्रमाण आहे अन् त्यापैकी बहुतांशी सध्या शिक्षण घेत आहेत. तर शेकडा २० टक्के तरुण मुले आणि मुली आहेत. पैकी निम्मे सध्या शिक्षण घेत आहेत आणि फक्त शेकडा ५ टक्के प्रौढावस्थेतील तरुण, तरुणी असून यापैकी अनेकांना आर्थिक ऐपत नसल्याने अविवाहीत असल्याचे समजते.

<u>विवाह व विवाहाचे वय</u> :-

विवाहीत पुरुष आणि स्त्रिया यांचे विवाहाचे वेळेचे वय लक्षात घेता ७ ते १० वर्षापर्यंत वय असताना विवाह झालेल्यात पुरुष शक्यतो आढळत नाही. तथापि स्त्रिया प्रत्येक गावनिहाय १/२ असल्याचे निदर्शन

होते. १० ते १२ वर्षांपर्यंत वय असतानाच विवाह झालेल्यांत पुरुषांपेक्षा स्त्रिया जास्त आहेत. परंतु सदरहू स्त्रिया फार वयस्कर आहेत. अलिकडे १६ ते २० वर्षांपर्यंत वय असताना विवाह झालेले पुरुष आणि स्त्रिया यांचे समप्रमाण आढळून येते. उदा.[सर्वेक्षण केलेले विवाहित पुरुष/स्त्रियांत १६ ते २० वर्षांपर्यंत वय असताना विवाह झालेले पुरुष ३९, तर स्त्रियाही ३८ आढळले]

एकंदरीत पूर्वी स्त्रियांचे लग्न लहान वयात होत असल्याचे जाणवते, कारण अलिकडे बरेच स्त्रिया आणि पुरुष विवाह करण्याची अपेक्षा असूनही विवाह खर्च करण्याची आर्थिक ऐपत नसल्याने काही अविवाहित आहेत, तर काही वयाच्या ३० वर्षांच्या पुढे केवळ "पैन" करून [साखरपुडा] करून गांधर्वांच्या संमतीने लग्नाशिवाय पती पत्नीप्रमाणे सुखीपणे संसार करीत आहेत आणि जेव्हा त्यांना ऐपत असेल तेव्हा "लग्नविधी" पार पाडतील.

कोकणातील आदिवासी जमातीत काही सुशिक्षित कुटुंबांचा अपवाद वगळता इतर आदिवासी समाजाप्रमाणे "हुंडा पद्धत" अस्तित्वात नाही. त्यांच्यात "देज पद्धत" रूढ आहे. आदिवासींमध्ये मुलाच्या वडिलांकडून मुलीच्या वडिलांना देज द्यावा लागतो. कुरगांव्यातील आदिवासींमध्ये हा देज पैशाच्या आणि धान्य रूपाने द्यावा लागतो. त्यामुळे या भागात मुलीच्या वडिलांपेक्षा, मुलाच्या वडिलांना लग्नाचा जास्त खर्च [रीतीप्रमाणे] करावा लागतो. अर्थात लग्न म्हटल्यावर दोन्ही वर आणि वधू पक्षांकडे खर्च होतोच. परंतु आदिवासींमध्ये वधूकडील खर्च हा वराकडील खर्चाच्या मानाने अल्पच असतो. ही बाब लक्षात घेता १०० ते ५०० रुपये लग्नखर्च झालेले १/२ विवाहित पुरुष आढळतात. परंतु त्यातील बरेच वयस्कर असल्याचे आढळून येतात. कारण पूर्वी देज रक्कम आणि महागाई कमी प्रमाणात होती, त्यामुळे कमी लग्नखर्च झालेला असल्याचे निष्पन्न होते.

<u>लग्नखर्च</u> :-

अलिकडे सरासरी रु.२००० ते ५००० रुपये लग्नखर्च झालेल्या पुरुषांचे प्रमाण जास्त आहे. उदा.[सर्वेक्षण केलेल्या कुटुंबात १०० ते ५०० रुपयात लग्न झालेले पुरुषांची संख्या फक्त ६ आहे. तर २००० ते ५००० रुपयात लग्न झालेल्या पुरुषांची संख्या ६१ इतकी आढळली.]

अर्थात, पूर्वीपेक्षा अलिकडे देज रक्कम, कपडेलत्ते, जेवणखाण इ.वरील एकंदरीत "लग्नखर्च" महागाईच्या वाढत्या प्रमाणात वाढणे स्वाभाविक आहे.

<u>देज</u> :-

"देज रक्कम" प्रत्येक गावनिहाय वेगवेगळी ठरलेली आहे. सरासरी रु. १०५ ते ३५१ रु. पर्यन्त "देज रक्कम" असल्याचे निष्पन्न झाले. अर्थात गांवागांवातील पंच लोकांनी देज रक्कम तशी निश्चित केलेली आहे.

सन १९६० पर्यन्त १०० ते ५० रु. देज रक्कम होती असे त्या भागातील काही वयस्कर आदिवासींकडून समजले. तथापि अलिकडे महागाईच्या वाढीमुळे देज रक्कम वाढविणे आवश्यक वाटल्याने गावपंचांच्या ठरावानुसार गांवनिहाय देज रक्कम निश्चित करण्यात आलेली आहे. यास अपवाद म्हणजे एखाद्या वरपक्षाचे कुटुंब अगदी गरीब परिस्थितीचे असल्यास गांवपंचांच्या संमतीने तडजोड करून ऐपतीप्रमाणे देज देण्याघेण्यास परवानगी दिली जाते.

या भागात "घरजावई पद्धत" ही अस्तित्वात असल्याचे समजते. ज्या आदिवासी युवकास देज रक्कम देणे, लग्नखर्च करण्याचीही आर्थिक ऐपत नाही असा गरजू, तरुण मुलास ज्यांना फक्त मुलीच आहेत, एकही मुलगा वारसदार म्हणून जन्मला नसल्यास संबंधित मध्यम वा श्रीमंत आदिवासी लोक घरजावई म्हणून त्या मुलास आपल्या घरीच शेतीकामासाठी घरकामासाठी ठेवून घेतात. असा संबंधित मुलीचे वडिल सर्व लग्नखर्च स्वतःच करतात. मग तो मुलगा उर्वरित आयुष्य आपल्या सासऱ्यांकडेच राबत राहून घालवित असतो.

उदा. [सर्वेक्षण केलेल्या कुटुंबातील विवाहीत युवकांनी १०० रुपयांपर्यंत देज दिलेले फक्त १० युवक आढळले, तर १०५ ते ३०१ रु. देज दिलेले ५० युवक आढळले आणि देज रक्कम अजिबात न दिलेले/ घरजावई असलेले फक्त ३ युवक आढळले.]

स्त्रीयांपेक्षा, युवकांचे शिक्षणाचे प्रमाण जास्त आहे. अशिक्षितां मध्ये शेकडा ७० टक्के लहान मुले आणि मुली यांचे प्रमाण आहे. ...रीत अलिकडे शासकीय आश्रमशाळा, स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या

जाणाऱ्या आश्रमशाळा, विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांच्या सुखसुविधांमुळे आणि शिक्षणाचे महत्व आता आदिवासींनाही पटू लागल्यामुळे साक्षरतेचे प्रमाण वाढीत लागल्याचे निष्पन्न होते.

या आदिवासी भागातील शेकडा ७५ टक्के पुरूष आणि स्त्रिया सध्या शिक्षण घेत आहेत. पैकी शेकडा ७० टक्के १४ वर्षाखालील मुले आणि मुली आहेत. तर शेकडा ५ टक्के १४ वर्षावरील मुले आणि मुली आहेत. बाकी शेकडा २५ टक्के पुरूष आणि स्त्रिया ह्यांनी शिक्षण अर्धवट सोडून दिल्याचे आढळून आले.

<u>जन्मविधी</u> :-

या भागातील आदिवासी जमातीत लहान मूल जन्मल्यानंतर मुख्यत: जर मुलगा जन्मला तर ३ दिवसांनी "पाचवी" पूजतात आणि जर मुलगी जन्मली तर ५ दिवसांनी "पाचवी" पूजतात. ही पूजाविधी गावातील "सोयरीण" [सुईण] करीत असते आणि १२ दिवसांनी "बारस" पूजतात. या दोन्ही पूजाविधीच्या वेळेस हळद, कुंकू, शेंदूर, पांढरा दोरा, २ खोबराच्या वाट्या, अगरबत्त्या, ७ प्रकारचे धान्य मुक्रर आणून सोयरीणच्या स्वाधीन करावे लागते. एक खोबरावाटी पिंपळाच्या झाडाजवळ ती ठेवते व उपरोल्लेखित साहित्याने घरात व पिंपळाच्या बुंध्याजवळ पूजाविधी करते. पिंपळाची पूजा करते, त्यास "मुंजा" म्हणतात.

उपरोक्त दोन्ही कार्यक्रमाच्या वेळी गावातील लोकांना, नातेवाईकांना आमंत्रित करण्यात येते, उपस्थित सर्वांना थोड्या फार प्रमाणात दारूपान करण्यात येते. त्यानंतर सर्वांना साधे जेवण [डाळ, वरण भात, भाजी वगैरे] देण्यात येते. या कार्यक्रमाच्या वेळी मांसाहार वर्ज्य असतो. ५ वी पूजल्यानंतर १२ दिवसांनी "बारस" पूजाविधी झाल्यावर संबंधित बाई घरकामे करायला लागते.

<u>विवाह व विवाह पध्दती</u> :-

या भागातील आदिवासींमध्ये पुरूषांच्या लग्नाची आणि स्त्रियांचे लग्नाची सर्वसामान्य वयोमर्यादाबाबत एकमत आढळून येत नाही. तथापि पुरूषांच्याबाबत सरासरी १६ ते २० आहे, तर स्त्रियांच्या बाबतीत सरासरी ४ ते २० आहे. अशाति वयात आल्यावरच पुरूष/स्त्रियांचे लग्न केले जाते असे

निष्पन्न होते. तथापि काही मुले आणि मुली हे कुपोषणामुळे अकाली प्रौढ होतात आणि त्यांचे लवकर लग्न झाले असे निदर्शनास येते. हा अपवाद असल्याचे या भागातील जाणकार आदिवासी मानतात.

<u>विवाह</u> :-

या भागातील आदिवासी पुरुष आणि स्त्रिया जास्तीत जास्त किती वेळा लग्न करता येते याबाबतही आदिवासींमध्ये एकमत आढळून येत नाही. तथापि सरासरी मत लक्षात घेता पुरुषांत मूलबाळ होत नसल्यास जास्तीत जास्त ३ वेळा लग्न केलेली उदाहरणे आहेत. तरी मूलबाळ जन्मले नाहीच तर तो आपल्या भावाचे किंवा काकाचे मुला/मुलीस "मांडीवर घेतो" [दत्तक घेतो] आणि आपले उर्वरित जीवन गुण्यागोविंदाने जगत राहतो.

स्त्रियांबाबत फक्त एकदाच लग्न करता येते, जर क्वचित वेळेस पती पत्नीचे आपापसात जमत नसेल, पत्नीस औषधोपचार करूनही मूलबाळ होत नसल्यास सतत दोघांत भांडणे होत असल्यास तिला दुसऱ्यांदा फक्त "गांधर्व" पद्धतीने लग्न करता येते. त्याआधि दोन्ही पक्षाकडून गावपंचायत एकत्र जमून उचित सल्लामसलत करून "दावा मोड" "काडीमोड [घटस्फोट] घेतल्याशिवाय दुसरे लग्न करता येत नाही.

<u>विवाह प्रकार</u> :-

या भागातील आदिवासींमध्ये लग्नप्रकाराबाबत सरासरी एकमत असल्याचे [illegible] आढळून येते. माहिती मिळाल्यानुसार लग्नप्रकार खालील प्रमाणे आढळून येतात.

अ] मागणी विवाह [कुंकू मागणे, बोलेपेन,झारणे, लग्न इ.]

ब] घरजावई

क] गांधर्व विवाह [ स्त्री संबंधी २ रा/३रा विवाह करताना तिला बाशिंग बांधत नाही, केवळ रात्रीच्या वेळेस रुईच्या झाडाबरोबर लावले जाते.]

ड] विधवा विवाह

इ] साटेवाट्या पद्धत

[आपआपसात मुला-मुलींची देवाण घेवाण, लग्नखर्च वाचविण्याच्या उद्देशाने केला जाणारा विवाह, परंतु सध्या हा प्रकार अस्तित्वात

नाही)

ई) सामुदायिक विवाह

(अलिकडे शासनाच्या मार्फत लग्नकार्य बचतीसाठी सुरु झालेला विवाह)

उपरोल्लेखित विवाह प्रकार या भागातील आदिवासींमध्ये असले तरी क्र.१ हा विवाह प्रकार जास्त रुढ आहे.

<u>लग्नबंधने</u> :-

या भागातील आदिवासींमध्ये लग्नाचे वेळी कोणकोणती बंधने पाळण्यात येतात या संदर्भात आदिवासींमध्ये फारशी कठोरता आढळून येत नाही. तथापि, बंधनाच्या काही प्रमुख बाबी खालीलप्रमाणे असल्याचे निष्पन्न होते.

(अ) विवाह हा स्वजातीतील स्थळ बघून ठरविला जातो.

(ब) बिगर आदिवासी वा परजातीय स्त्रीशी विवाह होत नाहीत.

(क) लग्नाचे वेळी वरवधूस एकटेपणी फिरु देत नाहीत.

(ड) गांधर्व पध्दतीत स्त्रीस बाशिंग बांधले जात नाही. खंड्या खांडाबरोबरच लग्न लावावे लागते.

(इ) लग्नाच्या वेळेस फक्त वराकडे "तालबोल्या" कार्यक्रम करतात. म्हणजे सव्वा किलो गव्हाच्या पिठाची पणती तयार करुन त्यात सव्वा किलो गोडतेल रात्रभर पणती पेटवून जागवावी लागते. पणती विझू न देण्याची काळजी घेण्यात येते.

(फ) लग्न लागल्यानंतर कुलदेवताची पूजा नववधूवरांच्या उपस्थितीत करावीच लागते.

(ग) लग्न कार्यक्रमात फक्त शाकाहारी जेवण दिले जाते, मांसाहार वर्ज्य आहे.

<u>देज व हुंडा पध्दती व दुसरे तिसरे लग्न</u> :-

सुरगाण्यातील आदिवासींमध्ये लग्नात "हुंडा" म्हणून देणे/घेणे असते, ते पैसे आणि धान्य स्वरुपाचे असते. शक्यतो लग्नाच्या आदल्या दिवशी किंवा लग्नाच्या १ ल्या दिवशी मुलाच्या वडिलांकडून मुलीच्या वडिलांना "देज" (साखरपुडा) वेळेस ठरलेल्या प्रमाणे रोख पैसे व धान्य द्यावे लागते. अर्थात गांवनिहाय, वरपक्षाच्या आर्थिक कुवतीनुसार ते

ठरविले जाते. देज हा वरवधू पक्षाकडील म्हणजे दोन्ही गांवातील "ग्रामपंचायत" ठरविते आणि जर वरवधू एकाच गांवातील असल्यास त्याच गांवातील पंच लोक वराकडील आर्थिक ऐपतीनुसार सल्लामसलत करून "देज" किती द्यावे, हे ठरवितात. "देज" च्या वेळेस वरवधूकडील सर्व नातेवाईक, मुलाच्या गांवातील नायकरी, गांवपंचायत मुलीच्या घरी एकत्र बसून "देज" देणे/घेण्याबाबत समारंभपूर्वक सामुहिक चर्चा करून ठरविले जाते. त्यानंतर ब्राम्हणाकडून लग्नाची तिथी काढून लग्नाचा दिवस निश्चित केला जातो. प्रत्यक्ष "देज" देवाण-घेवाण ही लग्नाच्या आदल्या दिवशी किंवा लग्नाच्या [illegible] दिवशी दोन्ही व्याही-व्याहीण अन्य नातेवाईकांच्या उपस्थितीत होत असते. यावेळेस कोणताही समारंभ नसतो.

लग्नाच्या वेळेस मुलीच्या वडिलांव्यतिरिक्त अन्य कोणा नातेवाईक वा गांव पंचायत यांना पैसे देण्यात येत नाही. फक्त वरपक्षाच्या आर्थिक कुवतीनुसार स्वेच्छेने मुलीच्या आई, आत्या, काकू, काका, मामा, मामीस, गांव पोलिस पाटील, सरपंच, गांव कोतवाल इत्यादींना मानपान म्हणून स्त्रियांना १-१ लुगडा, चोळी/ब्लाऊज पीस, परकर इ. आणि पुरुषांना टोपी, कमिज, धोतर इ. कपड्याच्या स्वरूपात देण्यात येते.

एकदा लग्न झाल्यानंतर वर एखादी मुलगी नांदली नाहीच तर दिलेल्या देजाचे पैसे वा अन्य वस्तू परत वसूल केले जातात, असे या [illegible] या भागातील आदिवासींमध्ये एकमत दिसून येते. झालेल्या एकूण लग्न खर्चापैकी निम्मे तरी पैसे रोखीने वसूल केले जातात. हे पैसे मुलीच्या वडिलांकडून गांवपंचायती समोर वसूल केले जातात. दिलेले धान्य वा मानपानाचे कपडेलत्ते परत वसूल केले जात नाहीत.

पहिली पत्नी हयात असताना तिच्या पतीस दुसरे लग्न करण्यासाठी हयात पत्नीच्या वडिलांना पैसे वगैरे काही द्यावे लागत नाही. कारण पहिली पत्नी हयात असताना आणि त्यांना अपेक्षेप्रमाणे मूलबाळ जन्मल्यावर दोघा पतीपत्नी सुखाने संसार करतात, संसार सुरळीतपणे चालू असल्यास या भागातील आदिवासी लोक शक्यतो दुसरे लग्न वा दुसरी पत्नी करीत नाहीत. तथापि काही वेळेस क्वचित प्रसंगी त्यांना जन्मणारी मूलबाळे जगत नसल्यास किंवा संतती होतच नसल्यास पतीपत्नी आपापसात सल्ला घेऊन तो पुरुष दुसरी पत्नी लग्न करून घरात आणतो.

दुसरी/तिसरी पत्नी करण्याचे प्रमुख कारणे याबाबत या गावातील आदिवासींमध्ये फक्त ३ प्रमुख कारणे असल्याचे निदर्शनास आले, पैकी १ ले कारण म्हणजे मूलबाळ होत नाही. होतात परंतु जगत नाहीत. फक्त मुलीच आहेत मुलगा वारसदार एकही नाही. अशा वेळेस पती वारसीत जास्त २ लग्ने करतो. १ ली/२ री पत्नी वांझ असल्याचे सिद्ध झाल्यास हे द्वितीय कारण आहे. १ ल्या पत्नीचे लहान मुले असताना ती मयत झाल्यास दुसरी पत्नी नांदण्यास तयार नसल्यास क्वचित प्रसंगी पती ३ रे लग्न व ३ री पत्नी करतो. हे तृतिय कारण आहे.

दुसरा/तिसरा विवाह करण्यासाठी हयात असलेल्या पहिल्या पत्नीला विरोध असतो काय ? या संदर्भात या गावातील आदिवासी-मध्ये होकारार्थी आणि नकारार्थी अशा दोन्ही मते निदर्शनास येतात. त्यापैकी होकारार्थी मत असलेल्याचे म्हणणे असे की, पहिल्या पत्नीला मूल-बाळ होत नसल्यास तिच्या संमतीने ती दुसरी पत्नी आणण्यास आपल्या पतीला परवानगी देते, आणि त्या दुसऱ्या पत्नीस अपेक्षेप्रमाणे मूलबाळ झाल्यास, जर पती पुन्हा ३ री पत्नी आणण्याचा विचार करीत असल्यास ती अशा अवस्थेत आपल्या पतीला विरोध करते. कारण त्यामुळे स्वतःचे संसारात हाल होऊ नयेत म्हणून ती काळजी घेते.

अशाप्रसंगी घरात समझोता न झाल्यास मग ते पतीपत्नी गांवपंचायतीत हजर करून, त्यांचा तंटा होऊन, पंचायतीकडून परवानगी मिळाल्यास तो पती २ रे लग्न करतो. परंतु अशा क्वचित घटना घडतात. अशा घटना घडल्याच तर पंचायतीसमोर, १ ली आणि २ री पत्नी पतीच्या जमिनीचा, घरातील मालमत्तेचा हिस्सा वेगळा लिहून घेतात कारण त्यांना आपल्या उर्वरित आयुष्यात हालअपेष्टा होऊ नयेत, ही काळजी असते.

नकारार्थी मत असलेल्याचे म्हणणे असे की, पहिल्या, दुसऱ्या पत्नीस मूलबाळ होत नाहीत, किंवा होतात परंतु जगत नाही अशा क्वचित प्रसंगी १ ल्या आणि २ -या पत्नीचा आपल्या पतीला ३ रे लग्न करण्यास विरोध नसतो.

दुसरा/तिसरा विवाह करण्यासाठी हयात असलेल्या पत्नीवर कोणतेही दडपण आणले जात नाही या उलट आवश्यक प्रसंगी पती पत्नीस

समझोता या रूपा घेतला जातो.

पतीपत्नीचे आपापसात जमत नसल्यास पुरुषाप्रमाणे पत्नीस २ रे/३ रे लग्न करण्यास परवानगी असल्याचे निदर्शनास आले. अगदी अशा घटना क्वचित वेळेस घडतात.

दोघांत वाद भांडणतंटे होत असल्यास अशा पतीपत्नींचा दोघांत समझोता होत नसल्यास ते दोघं स्वतः गांवातले राहणारे असल्यास आपापल्या नातेवाईकांना, गांवक-यांना एकत्र बोलावून गांवपंचायतीसमोर आपले म्हणणे स्पष्टपणे मांडतात, त्यावेळेस समझोता करण्यासारखी परिस्थिती नसल्यास "दावामोड/काडीमोड" (घटस्फोट) सर्वसमक्ष घेण्यात येतो. या वेळेस मुलीच्या वडिलांस, लग्नाचा जो काही खर्च झाला असेल त्यापैकी निम्मे तरी पैसे रोखीने मुलाच्या वडिलांना द्यावे लागतात. त्यानंतर त्या दोघांना दुसरा विवाह करण्यास परवानगी दिली जाते.

पती हयात असताना पत्नीने दुस-याशी लग्न केल्यास तिच्या लहान/मोठ्या मुलांचे पालनपोषण कोण करतो ? या संदर्भात या भागातील सर्व आदिवासींमध्ये एकमत असल्याचे निदर्शनास आले. ते असे की, जर पती हयात असताना पत्नीने दुस-या पुरुषाशी लग्न केलेच तर त्यांची जाणती मुले, मुली आपल्या बापाकडेच राहतात वा ठेवून घेतो. परंतु जी मुले, मुली अगदी लहान आहेत, जाणती नाहीत ती आपल्या आईकडे जाणती होईपर्यन्त राहतात. ती जाणती होईपर्यंत त्यांना सांभाळण्याची/पालनपोषणाची जबाबदारी त्या मुलांच्या आईला पार पाडावी लागते. अशा वेळेस तिने ज्या दुस-या पुरुषाशी विवाह केला असेल त्यास ती मुले जाणती होईपर्यंत सांभाळण्याची जबाबदारी पार पाडावीच लागते. कारण लग्न होण्याआधी या गोष्टीची जबाबदारी गांवपंचायत त्यांच्या अंगावर टाकीत असल्याने विवाह करार करताना ती बाब स्वीकारावी लागते. कारण दुसरा विवाह दोघांच्या मर्जीनुसार होत असतो. आणि पहिल्या पित्याचे ती लहान मुले, मुली मोठी झालीत/जाणती झाल्यास त्यांचा पिता त्यांना परत घेऊन येतो, नंतरचे पालनपोषण तोच करतो. त्यामुळे, काही अपवाद वगळता त्या मुलांची वाताहत होत नाही. मुले आणि मुली तरुण झाल्यावर त्यांना

त्यांचे संसाराचा जोडीदार शोधून देण्याची जबाबदारी/कर्तव्य त्यांचा पिताच पार पाडतो.

या भागातील आदिवासींमध्ये क्वचित ठिकाणी, एक/दोन घटना घडल्याचा अपवाद वगळता वरीलप्रमाणे बिगर आदिवासी पुरुषाशी विवाह अजिबात होत नाही. अशा प्रकारचा विवाह या भागातील आदिवासींमध्ये अस्तित्वात नाही. पर एखाद्या आदिवासी कुटुंबाने स्वेच्छेने त्याप्रकारे मुलीचा विवाह करून दिल्यास आदिवासी समाज त्यांच्याशी कसला संबंध ठेवीत नसतो. त्यामुळे अशा प्रकारात या भागातील आदिवासी लोक तिरस्करणीय दृष्टीने बघत असल्याचे निदर्शनास येते.

या भागातील आदिवासींमध्ये बालविवाह प्रथा अस्तित्वात नाही या बालविवाह घडल्याचे ऐकीवात नसल्याचे आदिवासींकडून समजते. आपापली मुले तरुण झाली/वयात आल्याचे निदर्शन झाल्याशिवाय लग्ने करीत नाहीत. सन १९६० अगोदर या भागात साक्षरतेचे प्रमाण फारच अल्प होते. अज्ञानपणा जास्त होता, त्यामुळे जरा वयस्कर असलेल्या या भागातील काही लोकांचा लग्ने पूर्वी अल्प वयात १० ते १२ वर्षांच्या दरम्यान झाल्याचे समजते. अलिकडे आदिवासींमध्ये ज्ञानपणात शिक्षणात वाढ होत असल्याने प्रौढ मुलामुलींचे लग्ने करण्यास आदिवासी समाजाची वाटचाल सुरु असल्याचे निदर्शनास येते.

या भागातील आदिवासींमध्ये जर क्वचित प्रसंगी एखादी पत्नी तरुण असताना तिचा पती मयत झाल्यास, ती "विधवा" तरुण स्त्री उर्वरित आयुष्य एकटेपणाने घालविणे योग्य नाही. तिला जीवन जगण्यासाठी आधार म्हणून नवीन जोडीदार हवा असल्याने या भागातील आदिवासी लोक गांधर्वपद्धतीच्या तत्त्वाने दुसरा विवाह "विधवा विवाह" करण्याचा प्रयत्न करतात. या भागातील आदिवासींमध्ये हा विवाह प्रकार सध्या अस्तित्वात आहे.

"विधवा विवाह" ह्यात "मागणी विवाह" प्रमाणे कुंकू मागणे, पेन भरणे, दहेज देणे घेणे, नाचगाणी, वाजवाजंत्री इ. सर्व कार्यक्रम असतो. परंतु एक नियम कठोर आहे आणि तो म्हणजे, त्या स्त्रीचे ज्या दुसऱ्या पुरुषाशी लग्न होणार आहे, त्यालाच फक्त

बाशिंग बांधण्यात येते. ब्राम्हणाला बोलावून लग्न लावले जात नाही, तर रात्रीच्या वेळेस त्या विधवेचे रुईच्या झाडाबरोबर विधीपूर्वक लग्न लावले जाते. त्यानंतर तिला तडक तिच्या नव्या नव-याकडे नांदण्यास पाठविले जाते. एकंदरीत हा विवाह एकाच दिवसाचा असतो.

.....

## प्रकरण - ५ वे

## कोकणा जमातीच्या लग्नाचे विविध कार्यक्रम

सर्वेक्षणातील "घोडांबे" या गावाचे पोलीस पाटील श्री. हरी गोविंद गांगुर्डे आणि श्री. एकनाथ सोनू गांगुर्डे या प्रतिष्ठित व्यक्तींशी झालेल्या चर्चेतून सुरगाणा तालुक्यातील आदिवासी [कोकणा, महादेव कोळी] यांच्यात लग्नाचे जे विविध कार्यक्रम या समारंभ होतात त्या संदर्भातील सविस्तर माहिती त्यांनी खालीलप्रमाणे दिली.

१. "मुलास मुलगी हेरणे"

आदिवासी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे मुलगा तरुण किंवा लग्नाचा झाल्यावर त्याचे लग्न करण्याचे आई, वडिल आणि नातेवाईक निश्चित करतात. त्यानंतर त्याचे आई-वडिल वा नातेवाईक मुलास योग्य असलेल्या मुलीच्या शोधात लागतात. यात्रा, लग्न, बाजार इत्यादि सामुदायिकप्रसंगी किंवा कोणाच्या माहितीतील मुलगी पाहिली जाते. त्यानंतर ती मुलगी योग्य आहे किंवा काय ह्याबाबत सर्वांत एकमत झाल्यावर त्या मुलाकडील २/३ पुरुष मंडळी मुलीच्या गांवी जाऊन "ती कोणाची मुलगी आहे, तिचे नातेगोते कोणाकोणाशी आहेत ? तिचे घराणे कोणते, कुळ कोणते इत्यादी माहिती घेतात.

२. "मुलीचे घर पाहणे" :-

या भागातील आदिवासी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे मुलाची आई, मुलगा, त्याचे नातेवाईक व गावांतील २/३ स्त्रीया मिळून मुलींच्या घरी जातात. तेथे गेल्यावर बारकाईने मुलीस पाहतात, आपल्या मुलाबरोबर त्या मुलीचा जोडा शोभून दिसेल किंवा नाही याचाही अंदाज घेतात. त्यानंतर "मुलीस मुलगा पसंत आहे किंवा नाही, मुलास ती मुलगी पसंत आहे किंवा नाही" याबाबत दोघांचा विचार लक्षात घेतला जातो. त्या मुलींच्या घराण्यासंबंधी व मुलीसंबंधी सर्व माहिती मिळविली जाते. मुलगी पसंत पडल्यावर व मुलींच्या आई-वडिलांना, नातेवाईकांना मुलाचे स्थळ पसंत पडल्यावर मुलाची आई मुलीच्या हातात सव्वा पांच किंवा सव्वा दहा रुपये ठेवते व "मुका" घेते. या कार्यक्रमास "मुलीचे घर पाहणे" असे म्हणतात.

३. <u>मुलाकडचे घर पाहणे</u> :-

"मुलीकडील घर पाहणे" या कार्यक्रमाप्रमाणे मुलीची आई, मुलीचे नातेवाईक व गावांतील महिला २/३ मिळून मुलांच्या घरी जातात. तेथे गेल्यावर मुलाच्या घराण्यासंबंधी व परिस्थितीसंबंधी उचित माहिती मिळवितात. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सर्व माहिती योग्य वाटल्यास मुलगा पसंत आहे असे सांगून जेवणखाण करून माघारी येतात. या कार्यक्रमास "मुलाकडचे घर पाहणे" असे म्हणतात.

४. <u>मुला, मुलींची तिथी पाहणे</u> :-

एखादया मुलगा, मुलगी पसंतीचा कार्यक्रम संपल्यावर मुलाचे आई-वडिल व नातेवाईक ब्राम्हणाकडे जातात. तिथे दक्षिणा देऊन मुला-मुलीचे नांवे, माहितीप्रमाणे त्यांच्या जन्माचा तारखा व दिवस, महिना व वर्ष सांगून त्यांच्या "कुंकू मागणे" अथवा "पेन" याबाबत योग्य तिथी पाहतात. त्यानंतर "कुंकू मागणे/पेन" (साखरपुडा) याची तारीख नक्की करतात. ती नक्की करल्यावर गांव कोतवालामार्फत मुलींच्या आई वडिलांना पेनची तारीख कळविली जाते. मुलींच्या आई-वडिलांना ती तारीख सोयीस्कर असल्यास "साखरपुडा" करण्याचे निश्चित होते अथवा मुलींच्या आई-वडिलांना ती तारीख सोयीस्कर नसल्यास अन्य सोयीस्कर तारीख दोघा नातेवाईकांमध्ये संमतीने बदल करून अंतिम तारीख निश्चित होते.

५. <u>कुंकू मागणे, अथवा पेन</u> (साखरपुडा)

मुलाचे आई वडिल, भाऊ बहिणी, नातेवाईक निश्चित केलेल्या ठिकाणी एकत्र जमतात. मुलाचे वडिल हळदीत कालवलेले तांदूळाचे दाणे माणसांकरवी गावांतील प्रत्येक घरोघरी देऊन मुलाच्या "पेनी" कार्यक्रमास येण्यास आमंत्रित करतो. त्या निमंत्रणान्वये गांवकरी (पुरुष/स्त्रीया) गावांतील प्रमुख, पंच, कारभारी ही सर्व मंडळी चांगले नवीन कपडे, वेशभूषा करून प्रथम मुलाच्या घरी एकत्र जमतात. त्यानंतर मुलाचे वडिल सर्व उपस्थितांना ऐपतीप्रमाणे जेवणाची पंगत देतो. जेवणखाण कार्यक्रम आटोपल्यानंतर सर्व जमलेली मंडळी संध्याकाळच्या सुमारास गॅसबत्ती, वाजंत्री सोबत घेऊन मोठ्या उत्साहाने मुलीच्या गांवी "पेनीच्या कार्यक्रमासाठी जातात. जर गांव जवळ असेल तर सर्वजण पायी चालत जातात

आणि जर गांव लांब असेल तर बैलगाडीने जातात. यावेळेस सोबत १ गुळाची ढेली [ढेप], मुलीसाठी १ नऊवारी पातळ, १ फडकी [ओढणी], ब्लाऊज पिसेस, खडी साखरेचापुडा, २ खोबऱ्याच्या वाट्या, ५ खारीका, ५ हळकुंडे, ५ सुपाऱ्या, १ कुंकूपुडी, वगैरे साहित्य ताटात ठेवून त्यात थोडे तांदूळ टाकून गुळाच्या ढेली व्यतिरिक्त अन्य वस्तू नव्या कापडाने बांधून घेतात.

मुलीच्या गावाला पोहचल्यावर सार्वजनिक ठिकाणी सर्व एकत्र जमतात. मुलीकडील घर ऐसपैस असल्यास सरळ मुलीच्या घरी जातात. तेव्हा मुलीचा बाप, नातेवाईक मुलाकडील आलेल्या सर्व मंडळींचे स्वागत करून त्यांना घरापुढील मंडपात हातपाय, तोंड धुण्यास पाणी देऊन बसकर टाकून पुरुष मंडळींना त्यावर आदराने बसवितात. स्त्रिया मुलींच्या घरात बसतात. नंतर सर्वांचा चहापान होतो. धूम्रपान करणाऱ्यांना बिडी/सिगारेट दिली जाते. इकडे मुलाकडील बाया रितीरिवाजाप्रमाणे "गाणी" म्हणतात. मुलींच्या गावांतील निमंत्रित केलेले सर्व स्त्री, पुरुष, मंडळी, गांवप्रमुख, पंच, कारभारी, नातेवाईक एकत्र जमल्यावर गुळाची ढेली [गुळाची ढेप] फोडून सर्वांना गुळ वाटण्यात येतो. त्यानंतर मुलाकडील प्रमुख, कारभारी, पंच लोक आणि मुलीकडील प्रमुख, कारभारी, पंच लोक यांच्यात साखरपुड्याची [पैनीची] बोलणी करतात. मुलांच्या वडिलांकडून बोलाचे पैसे सरासरी १५ ते २० रुपये घेण्यात येतात. त्याला "बोल" म्हणतात. त्यानंतर दहेज [देज] कपडे इ. देणघेण ठरविले जाते. दहेज [रोख पैसे आणि धान्य सरासरी ५ पायलीपासून १½ मणापर्यंत] मुलांच्या वडिलांच्या ऐपतीनुसार ठरविले जाते. त्यानंतर "बोलपेन" पक्की झाल्याचे जाहिर झाल्यावर वाजंत्री वाजविले जातात.

या कार्यक्रमानंतर मुलीसाठी आणलेले कपडे मुलीच्या गावातील पंचांना पहाण्यासाठी देतात, कपडे चांगले असल्याची खात्री झाल्यावर ते कपडे मुलीची बहिण असल्यास बहिणीकडे किंवा बहिण नसल्यास तिच्या वहिनी/काकूकडे दिले जातात. त्यानंतर मुलाकडील ३/४ बाया मुलीकडील मैत्रिणी, बहिणी, वहिनी, काकू इ. मुलीस ते कपडे नेसवितात. नंतर ती मुलगी मंडपात येते. तेथे मुलाची बहिण तिच्या कपाळाला कुंकू लावते. त्यावेळी

वाजंत्री वाजविण्यात येतात. नंतर मुलगी दोन्हीकडील उपस्थित गांवप्रमुख, गांवपंच, प्रतिष्ठित मंडळी, मुलाचे आई-वडिल, नातेवाईक यांच्या पाया पडते [वाकून नमस्कार करते.]

या कार्यक्रमानंतर मुलीचे वडिल सर्व उपस्थितांना साध्या जेवणाची पंगत देतो [दाळ, भात, भाजी] त्यानंतर मुलाकडील सर्व आलेली मंडळी ढोलवाजवून नाचण्याचा कार्यक्रम करतात. तो आटोपल्यावर रात्रीच्या रात्री आपल्या गांवी माघारी जातात. या अशा एकंदरीत सर्व कार्यक्रमास [पेनीचा कार्यक्रम" किंवा कुंकू लावणे अथवा पेन" म्हणतात.

६. मुलीला नांदण्यास सासरी पाठविणे [गरीबाचं लग्नं]

वर मुलाचे व मुलीचे आई-वडिल फार गरीब परिस्थितीचे असतील, त्या दोन्ही पक्षांना [वधू व वर पक्ष] लग्नकार्य करण्याची आर्थिक ऐपत नसल्यास गांवपंचायतीच्या सल्ल्याने, दोन्ही पक्षांच्या संमतीने "पेन" कार्यक्रम झाल्यावर मुलीस सरळ सासरी नांदण्यास पाठवितात व पुढे जेव्हा आर्थिक ऐपत होईल तेव्हा रितिरिवाजाप्रमाणे लग्न करतात. त्यावेळेस पेनीत [साखरपुड्याच्या वेळी] झालेल्या बोलणीची [देवाणघेवाणची] पुर्तता केली जाते.

७. लग्न झाल्याशिवाय मुलीला नांदण्यास सासरी न पाठविणे -

वर-वधू पक्षाकडील घरची आर्थिक परिस्थिती चांगली असल्यास "पेन" या[साखरपुडा] कार्यक्रम झाल्यानंतर लग्नतिथी ठरविण्यासाठी मुला, मुलीचे आई-वडिल, २/३ नातेवाईक ब्राम्हणाकडे जातात. व पुढे लग्न मुहूर्त, कार्यक्रम त्याप्रमाणे पार पाडतात. लग्न होण्याआधी पेनीत [साखरपुड्यात] ठरलेल्या ऐवज, कपडे, धान्य इत्यादिची मुलाच्या वडिलांकडून पूर्तता केली जाते, लग्न झाल्यानंतर मुलीस सासरी नांदण्यास पाठविण्यात येते.

८. लग्न कार्यक्रम :-

लग्न कार्यक्रम सरासरी ३ दिवसाचा असतो. लग्नाच्या आदल्या दिवशी किंवा लग्नाच्या १ ल्या दिवशी मुलाचे वडिल, २/३ नातेवाईक मिळून "पेन" मध्ये ठरलेल्या दहेजचे रोख पैसे, कपडेलत्ते, धाण [धान्य] घेऊन मुलीच्या वडिलांकडे जातात, तेथे दोन्ही व्याही व्याहीत [मुला, मुलीचे वडिल] मोजक्या नातेवाईकांच्या उपस्थितीत देवाणघेवाण होते,

यावेळेस कोणताही समारंभ नसतो.

मुलाकडे लग्नाचा "मंडप" टाकल्यानंतर त्यादिवशी रितीरिवाजाप्रमाणे देवदेवता, कुलदेवता यांचा पूजाविधी कार्यक्रम असतो, त्यास "तेलबोळ्या पडणा" असे म्हणतात. या कार्यक्रमात रात्री मुलाकडे "जागरण" केले जाते, जागरणासाठी ढाक वाजवून, गाणी म्हणतात. कुलदेवता समोर सव्वा किलो गव्हाच्या पिठाची पणती बनवून त्यात सव्वा किलो गोडेतेल पणती लावून जाळले जाते ही पणती दिवस उजेपर्यंत विझु न देण्याची काळजी घ्यावी लागते हा कार्यक्रम फक्त मुलाकडेच करतात.

दुसऱ्या दिवशी कुलदेवत पुजतात, १ बोकड, २/३ कोंबडे कुलदेवता समोर कापतात. नंतर मटनाचा स्वयंपाक करून सर्व उपस्थित लोक जेवण करतात. दुसरी [लग्नाच्या २ ऱ्या दिवशी] दोघांकडे मुला, मुलीस "हळद" लावण्यात येते. संध्याकाळी दोघांकडे "तेलन" कार्यक्रम करण्यात येतो. या कार्यक्रमात काश्याच्या [धातु] वाटीत थोडसं "खोबरेल तेल" घेऊन मुला/मुलीच्या डोक्यावर धरून रितीरिवाजाप्रमाणे बाया [बायका] देवांची गाणी म्हणतात. हा कार्यक्रम संपल्यानंतर हरभऱ्याच्या घुगऱ्या [शिजवलेले हरभरे] उपस्थितांना वाटण्यात येतात.

तिसऱ्या दिवशी मुलांच्या वडिलांच्या ऐपतीनुसार वाजंत्री घेऊन मुलांस नवीन कपडे घालून, मुंडावळी, बाशिंग बांधून व सजवून सर्व नातेवाईक, गावकरी, आमंत्रित सर्वजण मुलीच्या गांवी लग्नासाठी घेऊन जातात.

इकडे मुलीस नवीन कपडे नेसवून, दागिने घालून, सजवून, बाशिंग बांधून लोक तयारीत असतात. मुलाची वरात येत आहे असे कळल्यावर मुलीचे वडिल ऐपतीप्रमाणे उपलब्ध वाहन घेऊन नवरदेवाच्या स्वागतासाठी अर्धा कि.मी. रस्त्यावर जाऊन घेऊन गेलेल्या वाहनात बसवून आपल्या गावातील देवळासमोर घेऊन येतात. व देवळा समोर त्यांची बैठक बसवितात. बायका तेथे गाणी म्हणतात. त्यानंतर लग्न तिथीप्रमाणे उचित वेळेस नववधू वरास खांद्यावर घेऊन लग्नमंडपात आणले जाते. सर्व उपस्थितांना अक्षता वाटल्या जातात, ब्राम्हणाकडून पूजा सुरु होते आणि मंगलाष्टके व मंत्र म्हटले जातात. आणि उचित मुहूर्तावर टाळी लागते. तेव्हा मुलांकडून सोबत

आणलेली वाजंत्री वाद्ये वाजवितात. होणारी तरुण, तरुणी, नववधू वरास खांद्यावर घेऊन वाजंत्रीच्या तालावर नाचतात. हा कार्यक्रम संपल्यावर "पडाचा" (आहेर चा) कार्यक्रम सुरु होतो. या कार्यक्रमानंतर मुलीचे वडिल सर्व उपस्थितांना ऐपतीप्रमाणे गोडधोड, अन्यथा साध्या जेवणाची पंगत देतो. जेवणाचा कार्यक्रम संपल्यावर नववधूस बरोबर घेऊन वरपक्षाकडील मंडळी आपल्या गांवी माघारी येतात. नंतर मुलाच्या घरी "पडाचा (आहेरचा)" कार्यक्रम होतो. उपस्थितांना ऐपतीप्रमाणे मुलाचे वडिल जेवणाचा कार्यक्रम ठेवतात. त्यानंतर नववधूवराचे <u>बाशिंग</u> उतरविण्यात येते. त्यानंतर लग्नाचा कार्यक्रम संपतो.

लग्नानंतर ४/५ दिवसांनी मुलीस माहेरी घेऊन जाण्यास माहेराकडील माणसे येतात त्यास "मुवट्या" पध्दत म्हणतात. याचेवेळी एक नियम आहे. मुलीस माहेरी घेऊन जाण्याचा दिवस हा बुधवार किंवा शनिवार नसावा. चैत्र महिना नसावा, किंवा अमावस्या/पौर्णिमा नसावी असा संकेत पाळला जातो.

....

## प्रकरण - ६ वे

### डॉ. रेणू पटेल यांच्या सर्वेक्षण अहवालाचे संदर्भात अभिप्राय

१. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा या आदिवासी भागात आजही स्त्रियांचा बाजार मांडला जातो. पन्नास-शंभर रुपयांना स्त्रियांना या ठिकाणी लिलावात विकले जात आहे.

डॉ. रेणू पटेल यांचे हे विधान वास्तव परिस्थितीला धरून नाही. हे विधान पूर्णपणे निराधार आहे. स्थानिक आदिवासींनी हे विधान निंदानालस्तीच्या स्वरुपात घेतले आहे. डॉ. रेणू पटेल यांनी भेटी दिलेल्या सुरगाण्यातील हातरुंडी, प्रतापगड, तूर्पड, तब्माडा व घोडांबे या ५ गावांतील सर्वेक्षणानंतर असे निदर्शनास आले की, उपरोक्त विधानाप्रमाणे "या भागात कोठेही गुराढोरांसारखा स्त्रियांचा लिलाव या बाजार मांडला जात नाही. पन्नास शंभर रुपयांना स्त्रियांना या ठिकाणी लिलावात विकले जाते हेही साफ खोटे आहे."

५०-१०० रुपयांचा उल्लेखाचा संबंध "दहेज" च्या संबंधात असावा असे दिसते. दहेज म्हणजे स्त्रियांच्या विक्रीची किंमत नव्हे. वास्तव परिस्थितीत उल्लेखित दहेज रकमेबरोबर धान्य सरासरी ५ पायलीपासून २½ मणापर्यंत मुलांच्या वडिलांच्या ऐपतीप्रमाणे देणघेण ठरते. त्यास "पेन कुंकू मागणे [साखरपुडा]" असे म्हणतात. लग्नकार्यात कपडेलत्ते, दहेज, जेवणखावण इत्यादी वरील खर्च हा करावाच लागतो. या भागात अनेक आदिवासींची गरीब परिस्थिती असली तरी त्यांना १,००० ते १,५०० रुपये लग्नाचा खर्च होतोच. त्यामुळे या भागातील लग्नपद्धतीचा व रितीरिवाजाची माहिती न घेता व माहितीची शहानिशा न करता स्त्रियांच्या बाजाराची/ लिलावाचा उल्लेख आलेला दिसतो.

उपरोल्लेखित रु. ५०-१०० दहेजची रक्कम देखील या भागात सरासरी नाही. काही गावांत १०५ रु., कांही गावांत २५० रुपये तर काही गावांत ३५१ रु. असे कमी अधिक प्रमाण पंचायतीने ठरविलेले निदर्शनास आलेले आहे.

२. मुले देणारी मशिन :-

"सुरगाण्यातील आदिवासी स्त्रियांना मुले देणारी मशिन" म्हणून जे विधान करण्यांत आले आहे हे विधान चुकीचे आहे.

एखाद्या पुरुषास पहिल्या पत्नीपासून संतती होत नसल्यास तो पहिल्या पत्नीच्या सल्ल्याने व गांवपंचायतीचा सल्ला घेऊन दुसरी पत्नी घरांत आणतो. दुसऱ्या पत्नीस मूलबाळ होत नसल्यास दुसऱ्या पत्नीच्या सल्ल्याने गांवपंचायतीच्या सल्ल्याने तिसरी पत्नी घरी आणतो.

एखाद्या पुरुषाची पत्नी मयत झाल्यास व मयत पत्नीस लहान मुले असल्यास मुलांचे पालनपोषण करणे अवघड होते. त्याशिवाय तो पुरुष दुसऱ्या पत्नीस लग्न करून घरी घेऊन येतो याचा अर्थ असा होत नाही की, त्याला जास्त मुलांची हाव असते. तसेच स्त्रियांच्या प्रजनन क्षमतेवर तिची किंमत ठोकली जाते किंवा ठरते हे विधान देखिल निराधार आहे.

३. दुसरे विधान म्हणजे- " अतीशय अल्प वयातच येथील आदिवासी तरुणी दहा-बारा मुलांची माता बनते. " हे विधानही चुकीचे असून वास्तव परिस्थितीला धरून नाही. संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातील ५ गावांतील एकूण ६० कुटुंबांतील विवाहीत स्त्रियांचे लग्नाचे वेळेचे वय लक्षात घेता ९५ टक्के स्त्रियांची लग्नाची वये १७ ते २० या दरम्यानची आढळून आली. आहेत. या विवाहीत स्त्रियांना सरासरी २ ते ३ मुले असल्याचे आढळून आले आहे. यावरून डॉ. रेणू पटेल यांच्या विधानातील फोलपणा लक्षांत येईल.

"कुटुंब नियोजनाचा पूर्ण अभाव" .. डॉ. रेणू पटेल यांचे हे विधान पूर्णपणे चुकीचे आहे. वास्तव परिस्थिती वेगळीच आहे. डॉ. रेणू पटेल यांनी भेटी दिलेल्या गांवनिहाय कुटुंब नियोजनाची वास्तव परिस्थिती खालीलप्रमाणे संस्थेच्या सर्वेक्षणात आढळून आली आहे.

| अ.नं. | गांवाचे नांव | शस्त्रक्रिया झालेले पुरुष | शस्त्रक्रिया झालेल्या स्त्रिया | कॉपर टी | पील्स | एकूण स्त्रीया |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | छतरंडी | ८० | ५ | - | १० | १५ |
| २. | प्रतापगड | ४३ | २ | २ | १ | ५ |
| ३. | सूर्यगड | ५८ | १ | - | २ | ३ |
| ४. | तव्याडा | ४० | - | १० | १० | २० |
| ५. | घोडांबे | ३१ | ५ | ३ | ४ | १२ |

(सदर आकडेवारी प्राथमिक आरोग्य केंद्र, सुरगाणा येथून प्राप्त झाली आहे.)

यावरुन सर्वेक्षण केलेल्या गावांत कुटुंब नियोजनाचा पूर्ण अभाव आहे. हे विधान सिध्द होत नाही. उलट जननक्षमता असणाऱ्या पुरुषांनी शस्त्रक्रिया करुन घेतलेल्या आहेत व स्त्रिया कुटुंब नियोजनाची विविध साधने वापरत आहेत, असे चित्र दिसते.

४. "पुरुषांचा दहा वेळा/स्त्रीयांचा सहा-सात वेळा विवाह" ...

डॉ. रेणू पटेल यांचे अत्यंत चुकीचे असे हे विधान असून निराधार आहे. या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणातील एकूण ८० कुटुंबांत विवाहीत पुरुष आणि स्त्रीया यांची लग्नाची माहिती उपरोक्त विधानाशी अजिबात लागू होत नाही. सर्वेक्षणाची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे -

| अ.नं. | विवाहीत पुरुष/स्त्रीया | विवाह | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ ला | २ रा | ३ रा | ३ पेक्षा जास्त | |
| १. | पुरुष | ७४ | ९ | १ | — | ८४ |
| २. | स्त्रिया | ७२ | ८ | - | — | ८० |
| | | | | | एकूण- | |

वरील सर्वेक्षणाच्या आकडेवारीवरून हे सिध्द होते की, पहिला विवाह झालेले पुरूष आणि स्त्रीयांचे प्रमाण शेकडा ९० टक्के आहे. तसेच दुसरा विवाह झालेल्या पुरूष आणि स्त्रीयांचे प्रमाण शेकडा ९ टक्के आहे आणि तिसरा किंवा तीन पेक्षा जास्त अपवादात्मक प्रमाण शेकडा १ टक्का आहे. ही वास्तव परिस्थिती आहे. उपरोल्लेखित विधान अतिशयोक्तिपूर्ण आहे.

एखाद्या पुरूषास पहिल्या पत्नीपासून संतती होत नसल्यास तो दुसरी पत्नी घरी आणतो, सदर पत्नीची मुले जगत नसल्यास किंवा सर्व मुलीच जन्माला असल्यास मुलगा हवा या अपेक्षेने तिसरी पत्नी करतो. अशी प्रकरणे फारच विरळ असतात. याचा अर्थ या भागातील आदिवासी पुरूष सरासरी दहावेळा आणि स्त्रिया सहा-सात वेळा लग्न करतात असा निष्कर्ष काढणे सर्वस्वी चुकीचा आहे व वाचकजनांची दिशाभूल करणारा व आदिवासी संस्कृतीबद्दल गैरसमज पसरविणारा आहे.

५. "आदिवासी स्त्रीयांना जनावरापेक्षा वाईट वागणूक दिली जाते."

डॉ. रेणू पटेल यांचे हे विधानही अतिशयोक्तिपूर्ण आहे. संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात अनेक आदिवासी कुटुंबे आपापल्यापरीने कष्टाने शेती, मजुरी करून आपला उदरनिर्वाह करून सुखीतपणे संसार करीत असलेली आढळून आली आहेत. या भागातील आदिवासींमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान असले तरी येथे स्त्रियांना जनावरापेक्षा वाईट वागणूक दिली जात नाही. सर्वसामान्य स्त्रियांच्या सामाजिक दर्जाप्रमाणेच येथे दर्जा आहे. किंबहुना बाह्य समाजापेक्षा येथील स्त्रीला अधिक स्वातंत्र्य आहे. संसारातील मतभेद भांडण, तंटे, अपवाद म्हणून बिगर आदिवासी समाजात देखील होतात. सुशिक्षितांच्या नांवाखाली बिगर आदिवासी समाज आजही "हुंड्याच्या मोहापायी" कित्येक स्त्रियांचा छळ करतो. स्त्रीयांना मारहाण व वेळप्रसंगी आत्महत्येसही प्रवृत्त करतो. ही वागणूक कशी उचित नाही तसेच अपवाद म्हणून एखादा आळशी व दारूड्या माणूस आपल्या पत्नीस मारझोड करतो, दारूसाठी पैशाची मागणी करतो, बायको पोराबाळांकडे त्याचे लक्ष नसते. असाच त्याचा अर्थ निघू शकतो. परिस्थितीने लाचार झालेला एखादा बाप आपल्या मुलींच्या देण्यातून मिळणाऱ्या पैसे व धान्य

या अपेक्षेने अल्पवयात "पेन" करून देऊन टाकतो. तथापि, अशा अपवादात्मक एक-दोन घटनांवरून या भागातील सर्व आदिवासी समाजासंबंधी उपरोक्त विधान करून गैरसमज पसरविणे ही बाब हास्यास्पद आहे.

६. "मातेला मुलांची माहिती नसते"

नवरा-बायकोमध्ये वेळोवेळी, मतभेद, गैरसमज, तंटे इत्यादि सुरु असल्यास दोघात समझोता होण्यासारखी परिस्थिती नसल्याचे ते दोघे पंचायती समोर आपली तक्रार स्पष्टपणे मांडतात. यावेळेस गावांतील पंच लोक आवश्यक वाटल्यास "दावामोड, काडीमोड" [घटस्फोट] घडवून आणतात. या घटस्फोटाच्या वेळेस मुलीच्या वडिलांना, त्या मुलांच्या वडिलांना त्यांच्या लग्नासाठी जो एकूण खर्च झालेला असेल त्यातील निम्मी रक्कम पैशाच्यारुपाने त्याठिकाणी द्यायला पंचायत भाग पाडते. आणि नंतर त्या दोघांना दुसरा घरोबा करण्यास परवानगी दिली जाते. या घटस्फोटीत स्त्रीने दुस-या पुरुषाशी लग्न केल्यावर तिची पहिल्या नव-यापासून झालेली अपत्ये [अजाण/लहान असल्यास] गांव पंचायतीच्या सल्ल्याने जाणती [मोठी] होईपर्यंत संभाळावी लागतात. मोठी मुले, मुली असल्यास ती पित्याकडेच राहतात. जेव्हा मुले-मुली जाणती झाल्यावर त्यांना त्यांचा पिता परत घेऊन जातो व नंतर त्यांचे पुढील पालनपोषण तोच करतो.

अर्थात दोघांनी त्यांच्या गरजेनुसार घटस्फोट घेतलेला असतो. त्यामुळे या भागातील आदिवासी समाजाच्या रितीरिवाजाप्रमाणे लहान मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी आईला व मोठ्या मुलाच्या पालन पोषणाची जबाबदारी पुरुषाला पार पाडावी लागते. मुले, मुली सर्व मोठी झाली की, त्यांच्या मातेची जबाबदारी संपतेच. नव्या पतीपासून जन्मलेल्या अपत्यांचा सांभाळ करण्याची, नवा संसार सांभाळण्याची जबाबदारी सुरु झाल्यावर तिला आधीच्या मुलांची तेवढी काळजी घेणे शक्य होत नाही. तसेच आपली मूलबाळे असूनही जी स्त्री पतीपासून घटस्फोट घेऊन दुसरा घरोबा करते ती मूलतःच कठोर हृदयाची असते. त्यामुळे मुले लहान असेपर्यंत ती आपली, आणि मोठी झाल्यावर पित्याच्या मालकीची वाटतात. त्यामुळे तिला आधीच्या मुलांची माहिती असून नसून काय उपयोग. ई त्यांची माहिती देण्यात ती नेहमी नकारच देते किंवा माहित नाही असे सांगते.

७. "मुलगी तरुण झाली की विकून टाकतो. तर मुलास लाकडे तोडायला जंगलात पाठवतो."

कोणताही पिता, मुलगी तरुण झाली की, तिला उचित स्थळ बघून लग्न लावून जबाबदारीतून मोकळा होतो. हे सर्वत्र सर्व समाजात घडते. तथापि, वरील विधान आदिवासी समाजाची रूढी, परंपरा लग्नपद्धती याबाबत खुलासा लक्षात न घेता वापरलेले आहे. "पेन"/कुंकू मागणे" (साखरपुडा) यात "दहेज" पैसे आणि धान्याच्या स्वरूपात देणेघेणे ठरते, त्यानंतर गरीब परीस्थितीचे दोन्ही पक्ष असल्यास मुलीचा बाप लग्नाशिवाय मुलीस नांदण्यासाठी सासरी पाठवितो, तर चांगली परिस्थिती असलेला मुलीचा बाप लग्न लावून दिल्याशिवाय नांदण्यासाठी सासरी पाठवित नाही.

एकंदरीत "दहेज" देणे घेणे हे पंचायत ठरविते. त्यामुळे आदिवासी समाज रूढीप्रमाणे मुलांच्या वडिलांना "पेन" (साखरपुड्यात) ठरलेले दहेज मुलींच्या वडिलांना द्यावेच लागते. याचा अर्थ पैसे घेऊन विकून टाकतो असे म्हणणे सर्वस्वी चुकीचे आहे. आदिवासी समाजपद्धतीत ही प्रथा सर्वमान्य आहे. दुस-यानी त्यांची नीतीमूल्ये आदिवासींवर लादण्यात काय अर्थ आहे ? आदिवासींच्या रूढी, परंपरा याची पूर्ण चौकशी न करता दहेजचा या संदर्भात "मुलींच्या वडिलांना मिळालेले पैसे/धान्य ही मुलींच्या विक्रीची किंमत" असा अर्थ लावला आहे तो पूर्णतः चुकीचा आहे.

८. मुलगा तरुण असल्यास फक्त लाकडे तोडायला त्याचा बाप पाठवितो. हा निष्कर्षाही अगदी निराधार आहे. या भागातील आदिवासी लोक लाकडे तोडूनच आपली उपजिविका करतात, हे खरे नाही. ७५ टक्के शेती व्यवसाय करणारे व २० टक्के शेती व मजूरी करणारे आणि फक्त ५ टक्के लोक मिळेल त्या मजुरीवर आपला कसाबसा उदरनिर्वाह करणारे आहेत. काही अपवादात्मक प्रकरण म्हणून केवळ मजूरीवर जगणा-या कुटुंबातील मुलास त्याचा बाप लाकडे तोडायला पाठविल्यास त्यात गैर काय ? पोटाची खळगी भरण्यासाठी ते करणे त्याला भाग पडते. अन्यथा कुठे मजूरी न मिळाल्यास ते कुटुंब भुकेपोटी किती दिवस राहणार ? ही परिस्थिती डॉ. रेणू पटेल यांनी समजून घेतलेली दिसत नाही.

९. "तरुण पत्नीचा हव्यास" -

वास्तविक आदिवासी समाजाव्यतिरिक्त इतर अन्य समाजात देखील कोणताही पुरुष शक्यतो, तरुण मुलीचा शोध घेऊन विवाह करतो, मग याला आदिवासी समाजच अपवाद का समजायचा ? शेवटी समाजात राहणारा आदिवासी हा देखिल एक घटक आहे. त्यालाही भावना असतात. त्याला आपली पत्नी तरुण असावी असे वाटणे साहजिकच आहे.

१०. "एक दोन मुले झाल्यावर पुरुषाला आपल्या पत्नीचा कंटाळा येतो. मग एखाद्या "गरजूंचा" शोध घेऊन तो आपल्या पत्नीस विकून टाकतो व पुन्हा दुसऱ्या यौवनेच्या शोधा घेऊ लागतो."

हे विधान अत्यंत चुकीचे असून आदिवासींच्या भावना दुखविणारे आहे. आदिवासींमध्ये देखील अनेकविध सामाजिक बंधने आहेत, रुढी परंपरा आहेत, त्याबाबत अभ्यास करण्याची खरी गरज आहे. या संस्थेने सर्वेक्षण केले असता उपरोल्लेखित विधानाप्रमाणे कोणत्याही गावांत अशी घटना घडल्याचे ऐकीवात नाही व आढळली नाही.

११. मुलांच्या संगोपनाकडे दुर्लक्ष -

लग्न झाल्यावर व काही वर्षांचा कालावधी लोटल्यावर प्रत्येक विवाहितांना मुलाबाळांची अपेक्षा असते. त्याप्रमाणे आदिवासींनाही मुलांची आवड असणे स्वाभाविक आहे. परंतु बऱ्याच वेळेस, एखाद्या अत्यंत गरीब परिस्थितीच्या आईवडिलांना आपल्या मुलाबाळांच्या सर्वच गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. कारण मुळातच त्यांची गरीबी असल्यास श्रीमंत लोकांप्रमाणे पित्याला आपल्या मुलांचे लाड पुरविणे जमत नाही. केव्हातरी आपल्या आई वडिलासह लहान मुलांनाही अर्धपोटी झोपावे लागते. गरीब परिस्थितीतून जो माणूस जन्माला आलेला असेल, त्याला गरीबीची, हालअपेष्टांचे ज्ञान वा आठवण सतत मनात कोरुन ठेवलेली असते. त्यामुळे तो अशा अपवादात्मक गरीब कुटुंबात मुलांचे संगोपन योग्यरितीने होत नाही हे लक्षात घेता मुलांकडे दुर्लक्ष केले जाते हे विधान तितकेसे बरोबर होणार नाही. मुलांकडे दुर्लक्ष हा एकूण समाजाच्या अज्ञानाचा व परिस्थितीचाच भाग समजावा लागेल.

१२. शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नसल्याने मुले लाकडे तोडण्याची कामे करतात.

संस्थेच्या सर्वेक्षणाची माहिती लक्षात घेता, सुरगाणा तालुक्यात शासकीय व स्वयंस्फूर्त संस्थामार्फत चालविल्या जाणा-या अनुक्रमे ९ आणि ५ अशा एकूण १४ आश्रमशाळा सध्या सुरु आहेत. त्यात मोठ्या संख्येने आदिवासी मुले आणि मुली शिक्षण घेत आहेत.

शैक्षणिक सुविधांच्या दृष्टीने तालुक्याला १ कनिष्ठ महाविद्यालय, एक माध्यमिक शाळा व प्राथमिक विद्यामंदिरे आहेत. आदिवासी मुलामुलींसाठी शासकीय वसतिगृहे आहेत. काही गावांचा अपवाद वगळता प्रत्येक गावनिहाय अंगणवाड्या सुरु आहेत. पूर्वीच्या मानाने सध्या आदिवासींना शिक्षणाचे महत्व पटू लागल्यामुळे आपल्या मुलामुलींच्या भविष्याचा विचार करुन त्यांना सक्तीने शाळेत पाठवू लागले आहेत.

काही कुटुंबांचा अपवाद म्हणून परिस्थितीमुळे लाकडे तोडण्याची कामे करतात. ही बाब सत्य आहे. परंतु या भागात शिक्षणाच्या कोणत्याही सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे मुले लाकडे तोडण्याची कामे करतात. हे म्हणणे बरोबर नाही. सुविधा अपु-या आहेत त्यामुळे सर्वांना त्यांचा फायदा मिळत नाही असे फारतर म्हणता येईल.

१३. डॉ. रेणू पटेल यांनी आरोग्य समस्या संदर्भात सुरगाणा तालुक्यात हतरुंडी, प्रतापगड, सूर्यगड, सब्बाडा आणि घोडांबे या ५ गावांना भेटी दिल्या त्यावेळी ती उल्लेखित गावांतील प्रत्येकी २/३ स्त्रियांच्या भेटी घेतल्यात. त्यांच्याशी चर्चा करताना संबंधित स्त्रियांची परिस्थिती (उदा. हतरुंडी या गावांतील सौ. पारीबाई नावाची महिला) चिंताजनक व मदतीची याचना करणारी होती. कारण सर्वेक्षणाच्यावेळी समजले की, त्या दिवशी उल्लेखित स्त्रीचे त्यांच्या पतींबरोबर भांडण झाले होते हे गावातल्या शेजा-यांनाही माहित आहे. त्यामुळे डॉ. पटेल ह्या नेमक्या त्या बाईंशी चर्चा करण्यास गेल्या असता कोकणी बोलीभाषेत त्या बाईने रागारागाने उत्तरे आणि थोडीफार माहिती दिली असेल, असे त्या गावांतील गावक-यांकडून समजते.

त्यानंतर डॉ. पटेल यांनी त्यांचे वाहन थोट गावापर्यंत जाईल, अशा अन्य ४ गावांना भेटी देऊन गांवनिहाय २/३ बायांशी चर्चा केली. त्या आधारे त्यांनी आपल्या मूळ अहवालात "सुरगाण्यात, आदिवासी महिलांचा लिलाव खरेदी-विक्री, पुरुष दहा वेळा तर स्त्रीया सहा-सात वेळा लग्न करतात. इत्यादी विधाने वापरली आहेत. या अहवालांत आदिवासींच्या रूढी, परंपरांचा विचार झालेला नाही. तेथील परिस्थिती वेगळी असल्यामुळे या भागातील आदिवासींच्या भावना या अहवालाने दुखावल्या गेल्याने डॉ. रेणू पटेल यांच्या विरुद्ध तीव्र निषेध नोंदला गेला आहे.

डॉ. रेणू पटेल यांनी आपला अहवाल शासनास सादर करण्याआधी आदिवासी महिलांशी केलेल्या तोंडी चर्चेच्या आधारे त्यांनी काढलेले निष्कर्ष हे खरे आहेत किंवा काय ? या संदर्भात त्या भागातील जबाबदार व माहितगार व्यक्तींशी, आदिवासी विकास विभागाशी आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच या भागातील आदिवासी कार्यकर्ते, स्वयंस्फूर्त संस्थांचे कार्यकर्ते इत्यादिंची भेट घेऊन आपल्या निष्कर्षांची शहानिशा करायला हवी होती. परंतु तसे तिने न करताच "आपण अजब शोध लावला" या कल्पनेने हा अहवाल शासनास सरळ सादर केला आहे. या अहवालातील मजकुराचा तिखट मीठ लावून श्री. नारायण तिवारी यांनीही दैनिक लोकसत्ता या वृत्तपत्रात दि. २१-७-८८ रोजी, "सुरगाण्यात होतो आदिवासी महिलांचा लिलाव".. या शिर्षकाखाली भडक बातमी दिली आहे.

## १४. आदिवासी बोलीभाषा

आदिवासींचे एक वैशिष्ट्य म्हणजे, त्यांची जमातीनिहाय स्वतंत्र "बोलीभाषा" असते. उदा. भिली, गोंडी, कोरकू, कोलामी, कातकरी, वारली, कोकणी इ. बोलीभाषा आहेत. आदिवासी जमातींशी विचारविनिमय करायचा असल्यास, त्यांच्याकडून जमातीची रूढी, परंपरेची माहिती घ्यावयाची झाल्यास, त्यांच्याशी मनमोकळेपणे बोलण्यासाठी चर्चा करण्यासाठी त्या जमातीची थोडीफार "बोलीभाषा" अवगत असणे गरजेची बाब आहे.

डॉ. रेणू पटेल यांनी सुरगाण्यातील उल्लेखित आदिवासी भागात गेल्यावर फक्त स्त्रीयांशी चर्चा केल्याचे समजते आणि बहुतांशी आदिवासी स्त्रीयांना मराठी भाषा समजते. परंतु मराठी भाषा त्यांना चांगली बोलता येत नसल्याने त्या संबंधित गावांतील स्त्रियांनी आपल्या बोलीभाषेत म्हणजे "कोकणी" भाषेतून डॉ. पटेल हिला माहिती वा उत्तरे दिली.

मुलीच्या लग्नाबाबत एक उदाहरण म्हणून खालीलप्रमाणे प्रश्न व त्यास उत्तर काही आदिवासी बोलीभाषेत कसे विचारले जाते व त्याला उत्तर कसे मिळते याचा नमुना हा मुद्दा पटवून देण्यासाठी खाली दिला आहे.

उदा. प्रश्न - मुलगी घरीच आहे की लग्न करून दिली ?
उत्तर - लग्न करून दिली. [मराठी]

अ) प्रश्न - पोयरील देधी खादी का कोओच हाय ?
उत्तर - पोयरील देधी खादी. [भिल्ली]

ब) प्रश्न - पोहयेल देधी खादीही का गोओच हेय ?
उत्तर - पोहयेल देधी खादीही. [मावची]

क) प्रश्न - सुरीह वेच खायगोयला के घोरुच ते ?
उत्तर - सुरीह वेच खायगोयला. [पावरी]

ड) प्रश्न - पोतीला ईकी खादी का घरज अह ?
उत्तर - पोतीला ईकी खादी. [कोकणी]

उपरोल्लेखित बोलीभाषेच्या उदाहरणावरून एक महत्वाचा असा निष्कर्ष निघतो की, डॉ. पटेल यांनी विचारलेल्या प्रश्नास त्या आदिवासी स्त्रियांनी चांगल्या भावनेने आपल्या "कोकणी" बोलीभाषेतून उत्तरे दिली असणार व त्यात पोरगी विकून टाकली असे म्हटले असणार हे उघड आहे. या त्यांच्या उत्तरावरून डॉ. पटेल हीने चुकीचा निष्कर्ष काढलेला दिसतो. त्यामुळेच लग्न यास "विक्री-खरेदी" असे विधान वापरले असल्याचे सिद्ध होते. तसेच दहेज. हा कोणकोणत्या स्वरूपात दिला जातो. त्यांची ही पूर्ण चौकशी न केल्याने फक्त ५०-१०० रुपयांचा उल्लेख केला आहे. धान्य ही दहेजात दिले जाते याचा उल्लेख आला नाही. दहेज मुलांच्या वडिलाने मुलीच्या

वडिलात देणे यास डॉ. पटेल यांनी "खरेदी-विक्री/लिलाव" अशी विधाने वापरली आहेत. कारण या भागातील आदिवासींमध्ये दहेज [पैसे व धान्य] लग्नकार्यासाठी द्यावे लागते. त्याचबरोबर लग्नाच्या वेळेस कपडेलत्ते, जेवणखाण इत्यादिवर ही खर्च प्रत्येक मुलामुलींचे आई-वडिल करतात. मग त्याबाबत डॉ. पटेल यांनी आपल्या अहवालात का उल्लेख केला नाही. अर्थात आदिवासी समाजाच्या रूढी, परंपराबाबत सखोल चौकशी न करताच सादर केलेल्या अतिशयोक्तीपूर्ण/हास्यास्पद त्यांचा हा अहवाल आहे. सदर अहवालावरून वर्तमानपत्रात प्रसिध्दी दिल्यामुळे या भागातील आदिवासी कार्यकर्त्यात व सामान्य आम आदिवासी जनतेत बराच असंतोष निर्माण झाला होता. "डॉ. पटेल यांचे विरूध्द शासनाने कडक कारवाई करावी. तसेच डॉ. पटेल यांनी वस्तुस्थितीच्या विपर्यस्त विधाने केल्याबाबत या भागातील आदिवासींची जाहिर माफी मागावी" अशी येथील आदिवासींनी मागणी केली होती. त्याप्रमाणे डॉ. पटेल यांच्या निषेधार्थ मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष किसानसभा व डी.वाय.एफ.आय. संघटनेच्यावतीने सुरगाणा बंदचे आवाहन करण्यात आले होते. दिनांक १ ऑगस्ट १९८८ रोजी सुरगाणा बंद १०० टक्के यशस्वी लोक सांगतात. सुरगाणा येथे माजी सरपंच श्री. हिरामण कान्हे यांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन सभेत श्री. चिंतामण गावीत, श्री. हिराजी चौधरी, श्री. सोमनाथ बागुल, श्री. मुळे इत्यादिंची डॉ. पटेल यांच्या निषेधाची भाषणे केली व शासनाने डॉ. पटेल वर कारवाई करावी म्हणून ठराव पास केल्याचे कळते.

••••

## प्रकरण ७वे

## शिफारशी

सुरगाणा तालुक्यातील ठाणगी, प्रतापगड, सुर्गड, हतपाडा आणि घोडांबे या आदिवासी गांवाचा या संस्थेने सर्वेक्षण करताना काही रूढी, बेकारी, कुपोषण, आरोग्य, कुटुंबनियोजन, पिण्याच्या पाण्याच्या टंचाई रस्ते आणि पूल इ. संदर्भात या भागात विकास कार्यक्रमात ज्या काही त्रुटी आढळल्यात, त्याबाबत खालीलप्रमाणे काही सूचना व शिफारशी करण्यात येत आहेत.

१. आदिवासी समाजातील काही बाधक रूढी :-

सर्वेक्षण करताना या भागातील आदिवासींमध्ये लग्नाच्या संदर्भात २ पद्धती अस्तित्वात असल्याचे दिसले. (अ) लग्न लागण्या अगोदर (पेन विधी करून) मुलीस सासरी (मुलाचे घरी) नांदण्यास पाठविणे. (ब) लग्न झाल्यावर मुलीस सासरी नांदण्यास पाठविणे.

उल्लेखित २ पद्धतीपैकी (अ) बाबत परिस्थिती अशी की, गरीब परिस्थितीचे आईवडील आपली मुलगी तारुण्यावस्थेत पदार्पण करताच एखाद्या गरजू युवकाचा शोध घेऊन त्या मुलीचा "पेन" (साखरपुडा) करून देतात. त्यात ठरलेले "दहेज" (पैसे, धान्य) गांवपंचायतीच्या सल्ल्याने, मुलाच्या वडिलांकडून घेऊन त्या मुलीचे लग्न न लावताच तिला नवऱ्याच्या घरी नांदण्यास (सासरी) पाठवितात. त्या दोघांना आर्थिक ऐपत झाल्यावर त्यांचा लग्नविधी पार पाडण्यात येतो. तोपर्यन्त त्या मुलीस २/३ मुले झालेली असतात. त्यामुळे गरीब कुटुंबातील मुलगा त्याची आर्थिक ऐपत नसल्याने शक्य होईल तेव्हा लग्न करतो. परंतु जे काही श्रीमंत कुटुंबातील युवक असतात, ते असा गरजू आईवडिलांचा शोध घेऊन आर्थिक ऐपत लग्न नसल्याने नंतर "लग्न" लावू अशी खोटी आश्वासने देऊन फुकटच तारुण्यात पदार्पण केलेल्या गरीब मुलीस पत्नी म्हणून नांदवितात. अशा वेळेस दोघांच्या वयातील अंतर बरेच असल्याने साहजिक तिच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की, मुलगी कितीही गरीब कुटुंबातील असली तरी तिच्या लग्नाचे वय

१८ वर्षे असले पाहिजे. त्यामुळे तिच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणार नाही. तसेच अशा मुलीचे आणि मुलाचे वयात केवळ ५-६ वर्षांचे अंतर असावे. याबाबत स्थानिक ग्रामपंचायत व समाज संघटना जागृत असल्या पाहिजेत. या रूढींविरुद्ध प्रचार करून ती बंद कशी होईल ते पहावे.

तसेच देजाच्या स्वरूपातील देणेघेणे हे आदिवासी समाजात सर्वत्र सारखे आढळत नाही. उदा. मध्या "हतकंडी" गांवात १०५/- रु. तर "खोडंबे" गांवात ३५१/- रु. हे प्रमाण कुटुंबाच्या आर्थिक ऐपतीनुसार कमी/अधिक नाही. प्रत्येक गांवात गांव पंचायतीने ठरविलेले प्रमाण त्या त्या गांवातील श्रीमंत/मध्यम/गरीब कुटुंबांना सारखेच लागू असल्याचे समजते. त्यामुळे गरीब कुटुंबातील मुलांच्या आईवडिलांना तेवढी रक्कम देणे परवडत नाही. त्यामुळे मुलीचे लग्न न लावताच नांदविण्याचे प्रकार विरळ प्रमाणात अस्तित्वात आहेत. यासाठी अशी शिफारस करण्यात येते की, देज प्रमाणे सर्वत्र समप्रमाणात असावे आणि त्याचबरोबर ते समाजातील आर्थिक कुवतीवर पंचायतीने कमी/अधिक ठरविणे अत्यावश्यक आहे.

२. मूल जन्मल्यानंतर "पाचवी", "बारसे" पूजाविधी गांवातील "लोयरीण" (सुईण) मार्फत होतो. अशा वेळेस या भागातील आदिवासी नातेवाईकांना गांवकऱ्यांना आमंत्रित करतात. दारूपान जेवणखान कार्यक्रम ठेवतात याबाबत अशी शिफारस करण्यात येते की, अशा कार्यक्रमांना होणारा दारूपान जेवणखान हा खर्च अनावश्यक होतो. त्यासाठी लोकजागृती करावी लागेल.

३. मूलबाळ होत नाहीत, मूल जन्मते, परंतु जगत नाही, एकही जन्मला नाही इ.च्या नावाखाली काही ठिकाणी अपवाद म्हणून २ वेळा जास्त पत्नी करण्यात येतात. हा आदिवासी समाजाच्या सुधारणेच्या वाटेतील अडथळाच म्हणता येईल. या संदर्भात अशी शिफारस करण्यात येते की, ज्या कुटुंबात २ किंवा ३ वर्षात कुणाही मूलबाळ होत नसल्यास आपल्याच नात्यागोत्यातील ज्यांची जास्त मुले/मुली आहेत, त्यांचा एखादा मुलगा व मुलगी "दत्तक" घेणे उचित होईल. सध्या काही दूरदृष्टीचे आदिवासी युवकांनी तसा प्रयत्न केल्याचे समजते.

त्यामुळे ही प्रथा रूढ होणे गरजेची बाब आहे. त्यामुळे स्त्री पुरुषांचे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य सुधारण्यास मदत होईल आणि त्यांना फक्त मुलेच आहेत, मुलगा जन्मत नसल्यास त्यासाठी जास्त हव्यास बाळगू नयेत. कारण मुलाच्या हव्यासापायी आर्थिक ऐपत नसताना मुलामुलींची संख्या वाढत जाऊन शेवटी संसारात नैराश्य येते. आपल्या पोराबाळांची, बायकोच्या पालनपोषणाच्या समस्या वाढत जातात. त्यातून पुढे अनेकविध गुंतागुंतीच्या समस्या वाढतच जातात.

२. सामाजिक बेकारी :-

उपरोल्लेखित बाबींमध्ये मुलामुलींची संख्या वाढल्यास त्यांच्या आईवडिलांची मुळची गरीबी असल्यास त्या सर्वांचा उदरनिर्वाहाच्या, पालन पोषणाची जबाबदारी वाढत जाते. स्वतःच्या मालकीच्या निकस जमिनीतून त्यांना वर्षभर पुरेल इतकेही उत्पादन येत नसल्याने आणि अपेक्षेप्रमाणे रोजगार, मजुरी वेळोवेळी मिळत नसल्याने आणि पोटाची खळगी भरण्यासाठी मुलांच्या शाळेत जाण्याच्या, मौजमजा, खेळ खेळण्याच्या वयात त्यांना जंगलात जाऊन लाकडे तोडून ते विक्री करून त्याद्वारे उदरनिर्वाह करावा लागतो. तर काही श्रीमंत माणसांकडे "सालदारकी" करतात. गुरेढोरे सांभाळतात. त्यामुळे शिक्षणात हवी ती प्रगती न झाल्याने त्यांच्या अज्ञानात भर पडते. संधीसाधू सुशिक्षित लोक त्यांना अल्प मजुरीत राबवून घेतात. त्यांच्यात अज्ञानपणा असल्याने ते येणाऱ्या प्रसंगी जे समोर येईल, मिळेल त्यावर समाधान मानून हालअपेष्टात जीवन कंठतात. ते भावी आयुष्याचा विचार करण्यास असमर्थ असल्याने त्या दुःखी आयुष्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न कधीच करीत नाही. अशाने सामाजिक बेकारी वाढत जाते. त्यांना अज्ञानामुळे अनेक वाईट सवयी जडतात. यासाठी अशी शिफारस करण्यात येते की, या भागातील आदिवासींनी जास्त मुलांची हव्यास न बाळगता १/२ मुलात समाधान मानून कुटुंब नियोजनाचा मार्ग अवलंबिणे निकडीचे आहे. आपल्या मुलांना शाळेत सक्तीने पाठवावेत.

३. लहान मुलांचे कुपोषण :-

या भागातील आदिवासी मुलांचे कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे डॉ. रेणू पटेल यांच्या अहवालात म्हटले आहे. ही बाब सत्य आहे. त्यामुळे अशी शिफारस करण्यात येते की,

वाटप सध्या ज्या प्रमाणात करण्यात येत आहे, ते वाटपाचे प्रमाण वाढविण्यात यावे. अंगणवाड्यातून फक्त "दूध" वाटप होते. याकडेही संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. आणि या विभागातील जबाबदार आरोग्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दर महिन्यातून अंगणवाड्यातील मुलामुलींची आरोग्य तपासणी व्हावयास पाहिजे.

(४) आरोग्य :-

या भागातील आदिवासींच्या आरोग्याबाबत डॉ. रेणू पटेल यांनी आपल्या अहवालात उल्लेख केल्याप्रमाणे कुपोषण आणि तत्संबंधी रोगांचा प्रसारही या भागात मोठ्या प्रमाणावर होत असतो. सहा वर्षा-पर्यन्तच्या मुलांची दगावण्याची संख्याही खूप आहे. पावसाळ्यात हमखास होणारे रोगही अनेकदा जीवघेणे सिद्ध होतात. कुपोषणामुळे प्रसूतिकाळात दगावणाऱ्या मातांचीही संख्या येथे अन्यत्रापेक्षा दुप्पट आहे. आणि यासाठी शिफारस करण्यात येते की, एकात्मिक बालविकास आणि माता बालसंगोपन केंद्राच्या या क्षेत्रातील जबाबदार अधिकारी आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य अधिकारी यांनी आपल्या नियंत्रणा-खाली असलेल्या कर्मचाऱ्यांना घेऊन वेळोवेळी मध्यवर्ती गांव निवडून आरोग्य शिबिरे आयोजित करावीत आणि येथील आरोग्य समस्येचे निराकरण करावे. आवश्यकतेनुसार "कोकणी बोलीभाषा" अवगत असलेल्या डॉक्टरांकरवी आदिवासी स्त्री पुरुषांना आरोग्यविषयक सल्ला द्यावा.

(५) कुटुंबनियोजन :-

या भागातील आदिवासींमध्ये कुटुंब नियोजनाबाबतची आकडेवारी लक्षात घेता तीत वाढ करण्याची अत्यावश्यकता आहे.

आरोग्याच्या संकेतानुसार सुमारे २५०० लोकसंख्येसाठी ए. एन. एम. (ऑक्झिलरी नर्स मिडवाईफ)-ची एक जागा असूनही सध्या सुरगाण्यात सरासरी १५०० ते २००० लोकसंख्येसाठी एक ए. एन. एम. आहे. स्थानिक परिस्थितीनुसार दुर्गम भागामुळे व विखुरलेल्या लोकसंख्येमुळे एका ए. एन. एम. ला उल्लेखित सर्व लोकांचे आरोग्यविषयक पाहणी/देखरेख करणे शक्य होत नाही. त्यामुळे या भागातील लोकसंख्येच्या मानकात शिथिलता आणून सरासरी १००० लोकसंख्येस एक ए. एन. एम. देण्याचा प्रयत्न जिल्हा

आरोग्य अधिकारी यांनी करावा, अशी शिफारस करण्यात येते.

सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक शस्त्रक्रिया सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी आरोग्य खात्याकडे, जबाबदार अधिकाऱ्यांना शिफारस करण्यात येते. कुटुंब नियोजनाच्या प्रचारा प्रसारासाठी स्थानिक बोलीभाषा अवगत असणाऱ्या सुशिक्षित बेकार युवक आणि युवतींना दरमहा ५०/- रु. आर्थिक सहाय्य देऊन मदत घ्यावी आणि मोठ्या संख्येने आदिवासी स्त्री-पुरुषांना कुटुंब नियोजनाबाबत प्रवृत्त करण्यात यावे. तसेच कुटुंब नियोजनाच्या शस्त्रक्रिया झालेले स्त्री, पुरुष आणि कु. निरोधक विविध साधने वाटप केलेल्या संबंधित स्त्री पुरुषांची "पाठपुरावा" काळजीपूर्वक करण्यात यावा.

६. पिण्याच्या पाण्याची टंचाई :-

डॉ. रेणू पटेल यांनी भेटी दिलेल्या ५ गांवनिहाय पिण्याच्या पाण्याची परिस्थिती खालीलप्रमाणे आहे.

(अ) हतनंदी :- या गांवात एक सार्वजनिक विहिर आहे. या विहिरीचे पाणी गांवातील लोक पिण्यासाठी वापर करतात. या विहिरीचे पाणी कायम (बारमाही) पुरते.

(ब) मुसापाडा :- या गांवाशेजारीच सुमारे अर्ध्या मैलावर "पाडार तलाव" आणि बारमाही पाणी असलेला नाला आहे, या गांवातील लोक या ठिकाणाहून पाणी वापरतात.

(क) सुरंगड :- या गांवात विहिर नाही. तथापि, शेजारच्या "पाडार तलाव" नाल्यावरून पाणी वापरतात. परंतु हे पाणी त्यांना कायम पुरत नाही. त्यामुळे सदरहू गांवात पाणी टंचाईग्रस्त म्हणता येईल.

(ड) कुवाडा :- या गांवात एक हातपंप शासनाने बसवून दिलेला आहे. तथापि, सदरच्या पंपाचे पाणी कायम पुरत नाही. या गांवी विहिर नाही. या गांवाच्या शेजारी एक नाला वाहतो त्यात पाणी असेपर्यन्त या गांवातील लोक पाणी वापरतात. अशांत हे गांव ही पाणी टंचाईग्रस्त म्हणता येईल.

(ब) <u>घोडांबे</u> :- या गांवात विहिर आहे. या विहिरीला बारमाही पाणी असल्याने लोक या विहिरीचे पाणी वापरतात. तसेच या गांवाच्या पूर्वेस सुमारे १/२ मैलावर एक नदी वाहते. एकंदरीत पिण्याच्या पाण्याच्या टंचाई बाबत २ गांवे "सुर्पाड आणि कपाडा" ही असल्याचे आढळले. तथापि डॉ. रेणू पटेल यांनी आपल्या अहवालात .. पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई असल्याचा उल्लेख केला आहे. पाण्याची टंचाई असल्याने या भागातील आदिवासी उन्हाळ्यात आंघोळीही करीत नाहीत. व कपडेही धूत नाहीत. असे ठामपणे विधाने केलेले आहेत. डॉ. पटेल ह्यांनी या भागात जून महिन्याच्या ६ ते ८ तारखेत भेटी दिल्यात तेव्हा उन्हाळा नव्हताच आणि पाणी टंचाई म्हणून सरासरी सर्वच सर्वच आदिवासी लोक आंघोळी करीत नाहीत व कपडेही धूत नाहीत, अपवाद वगळता हे विधान बरोबर नाही.

<u>उपरोल्लेखित टंचाईग्रस्त दोन गांवांना ज्या वेळेस पाण्याची टंचाई भासेल अशा वेळेस शासनाने टँकरने पाणी पुरवावे अशी शिफारस करण्यात येते. कारण ही दोन्ही गांवे रोडवर आहेत. पाण्याचा टँकर ह्या गांवात जाण्यात काहीच अडचण येणार नाही</u>.

## इतर शिफारशी :-

१. सुरगाणा तालुक्यातील आदिवासींवरील काही बाधक रुढी बंद करण्यासाठी आदिवासींमध्ये जागृती करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी दरवर्षी या भागात "<u>आदिवासी जागृती व प्रसिद्धी सप्ताह</u>" या सारखे सामुहिक कार्यक्रम या भागातील आश्रमशाळेच्या ठिकाणी प्रभावीपणे राबविण्यात यावेत.

२. या भागातील आदिवासींची जमीन डोंगराळ, खडकाळ असून निकृष्ट अशी आहे. त्यामुळे त्यांना वर्षभर पुरेल इतकेही उत्पन्न मिळत नसल्याने वा अन्यत्र पुरेसा रोजगार उपलब्ध होत नसल्याने लाकूड-तोडीने उदरनिर्वाह करीत असतात. त्यामुळे त्यांना चांगल्या आहाराची अपेक्षा असूनही परिस्थितीमुळे ते शक्य नसते, त्यामुळे कुपोषणाच्या

समस्या वाढतात.

या भागातील प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी गरजू आदिवासींना गाई, म्हशी, शेळ्या, वाटप करणे, लघुउद्योग वगैरे सुरु करण्यासाठी अर्थपुरवठा वेळोवेळी करणे इष्ट ठरेल.

३. या भागातील अति दुर्गम भागात सध्या येथे रस्ते नाहीत, रस्ते आहेत, परंतु पूल नाहीत, येथे पावसाचे पाणी अडविण्यासाठी भौगोलिक परिस्थिती उचित आहे, परंतु पाझर तलाव नाहीत, अशा ठिकाणी शासनाच्या बांधकाम विभागाने व वन खात्याने एकत्रित प्रयत्न करुन कामे सुरु करावीत, ज्यामध्ये स्थानिक आदिवासींना रोजगार उपलब्ध होऊ शकेल, अशाने त्या दुर्गम भागातील आदिवासी रोजगार शोधार्थ अन्यत्र भटकंती करणार नाहीत, आणि आदिवासींच्या श्रमातून तालुक्याच्या विकासात ही हातभार लागेल.

४. सुरगाणा तालुक्यात सध्या एकूण ५ "प्राथमिक आरोग्य केंद्रे" असून या भागातील भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, अति दुर्गम भागात राहणारे आदिवासी हे वाड्यापाड्याने विखुरलेले आहेत, त्यामुळे या भागातील आरोग्यविषयक समस्या डोकावत असते. त्यामुळे शासनाने या तालुक्यात शक्यतो दुर्गम भागातील २ मध्यवर्ती ठिकाणी आणखी दोन "प्राथमिक आरोग्य केंद्रांना" मंजूरी द्यावी, असे या संस्थेचे मत आहे.

५. सुरगाणा तालुक्यात शासकीय आश्रमशाळा सध्या ९ आहेत, त्यात मोठ्या प्रमाणात आदिवासींची मुले आणि मुली शिक्षण घेत आहेत, तथापि, अति दुर्गम आदिवासी भागात जादा २ "शासकीय आश्रमशाळा" उचित ठिकाणी सुरु करण्यास शासनाने मंजूरी देणे आवश्यक आहे, असे या संस्थेचे मत आहे.

......